रघुवीर सामंत

# माणसाचें शेंपूट

नवव्या-दहाव्या यत्तांतील कुमार श्रेणीच्या बालवाचकांसाठीं
मनोरंजक पद्धतीची-उपजत बुद्धि व मानवी प्राण्याची
प्रगति याबाबतची-सुलभ शास्त्रीय चर्चा

तज्ञ मार्गदर्शनासह

सुधारलेली द्वितीय आवृत्ती।

कुमार श्रेणी

मूल्य १२ आणे

पुष्प ४ थें

अमर ज्योति वाङ्मय

# माणसाचें शेंपूट

......उपजत बुद्धि व मानवी प्राण्याची प्रगति या बाबतची साध्या मनोरंजक पद्धतीची शास्त्रीय चर्चा.................


लेखक

रघुवीर सामंत


[ नवव्या-दहाव्या यत्तांसाठीं पुरवणी वाचन ]

★

—विद्यार्थी मार्गदर्शन—

श्री. श्यामराव एस्. पाटकर, एम्.ए., एस.टी.सी.

[ अध्यापक, चिकित्सक स. शि. हायस्कूल, मुंबई ४ ]


सुधारलेली द्वितीय आवृत्ति ] पुष्प ४ थें [ दीपावलि १८७३

—अमर ज्योति वाङ्मय प्रकाशन—

शास्त्रीय-कुमार-श्रेणी ] [ कुतूहल-१-उपजत बुद्धि

सौ. स्नेहल सामंत, पी. ए.
यांनीं
' अमर ज्योति वाङ्मय प्रकाशन ' करितां
१४बी, हरजीवनदास एस्टेट,
व्हिन्सेन्ट रोड, दादर, मुंबई १४,
येथें प्रसिद्ध केलें.

या व पुढील सर्व आवृत्त्यांचे सर्व प्रकारचे हक्क
**सौ. स्नेहल सामंत, पी. ए.**
संचालक 'अमर ज्योति वाङ्मय प्रकाशन' यांजकडे

**कुतूहल – १ – माणसाचें शेंपूट**

१ सुट्टीचा उपयोग
२ पाहायला शिका
३ पाळीव प्राणी
४ जंगलें नि शहरें
५ माणसाचे प्रयोग
६ छोटे संशोधक
७ नैसर्गिक निवड
८ उपजत बुद्धि
९ जन्मजात जाणीव
१० मागील इतिहास
११ नवीन ' बुद्धी '
१२ भविष्यकाळीं

सुधारलेली द्वितीयावृत्ति–दिवाळी १८७३–मूल्य १२ आणे.

**श्री. रघुनाथ ज. सामंत,** बी.ए.बी.टी.
यांनी
सागर साहित्य छापखाना,
२०, त्रिभुवन रोड, मुंबई ४;
येथें मुद्रित केलें.

मुलांची अतिशय आवड असलेले, प्रेमळ,
रसिक, चिकित्सक वृत्तीचे माझे स्नेही
**श्री. चिंतूताल्या नाईक**
यांस प्रेमादरपूर्वक

# पालकांशीं हितगुज–

Instincts हा विषय तसा कठीण–विशेषतः, मुलांच्या सुगम आटोक्यांत आणणें फारच कठीण आहे. पण प्रस्तुत ' माणसाचें शेंपूट ' १९४४ सालीं प्रथम प्रसिद्ध झाल्यानंतर कांही अनोळखी शिक्षणतज्ञ व चोखंदळ पालक यांनीं पत्रें पाठवून व तोंडीहि या पुस्तकाच्या लेखन-पद्धतीचा ( अनाहूत अभिप्रायानें ) रसिकपणें गौरव केला. तें समाधान दिल्याबद्दल त्यांचे विनम्र आभार.

असलीं आणखी विविध पुस्तकें प्रकाशित करण्याचा मानस आहे. तथापि, या प्रकारचें प्रकाशन प्रकाशकाला फार आंतबट्ट्याचें जातें. याच पुस्तकाची पहिली हजाराची आवृत्ति संपण्यास जवळ जवळ सहा वर्षें लागलीं.

नव्या दृष्टीच्या चोखंदळ पालकांना, यादृष्टीनेंच, विनम्र विनंति, कीं, त्यांनी केवळ मनोरंजनात्मक पुस्तकेंच आपल्या बाळांच्या हातीं देण्यापेक्षां असल्या चर्चात्मक, विचारप्रवर्तक व शास्त्रीय दृष्टीनें लिहिलेल्या पुस्तकांचीहि खरेदीच्या वेळीं अगत्यपूर्वक निवड करावी आणि अप्रत्यक्षपणें असल्या प्रकाशनांचा अधिकाधिक पुरस्कार करावा. असा आश्रय मिळत गेला तरच असलें बालवाङ्मय अधिकाधिक तयार होऊं शकेल व त्यांतून वाढत्या बाळांचा अमाप फायदा होईल.

' अमरज्योतिवाङ्मया ' तर्फे कुतूहल–२–घरांत, ३–आंवतीं–भोंवतीं ४ चौफेर हीं आणखी तीन अशाच धर्तीचीं पुस्तकें लौकरच प्रकाशित होणार आहेत. व त्यांच्या पाठोपाठ याच ' कुतूहल ' विभागाची ५-दर्यापोटीं, ६- भूगर्भांत ७-अंतरिक्षांत ८-नवलसाम्राज्य इ. पुढील पुष्पें प्रकाशिण्याची उमेद आहे. पण तें अर्थात् सर्व चोखंदळ वृत्तीच्या पालकांकडून मिळणाऱ्या आश्रयावरच अवलंबून राहणार—

दादर—
धनत्रयोदशी १८७३

**रघुवीर सामंत**
संपादक—' अमर ज्योति वाङ्मय '

## माणसाचें शेंपूट–

[ वांचपणी–मार्गदर्शन ]

(१) सुट्टींतले रवीचे बेत कोणते होते ? ते पार पडले कां ? (२) तुम्ही आपली सुट्टी कशी घालवतां ? (३) मामांच्या आगमनानंतर रवी-दिनू लाजले कां ? त्यांच्या कार्यक्रमांत मग कोणता फरक पडला ? (४) ते दोघे डोळे असून आंधळे कसे ? (५) कुतूहलानें आपलें ज्ञान कसें वाढतें ? (६) आपले सर्वांत हुशार जाणते मित्र कोणते ? (७) त्याच त्यांच्या कानांनी व डोळ्यांनी रवी-दिनूंना कोणत्या नवीन गोष्टी ऐकूं–दिसूं लागल्या ? कां बरें ? (८) पाळीव प्राणी व जंगली प्राणी, शहरी माणूस व जंगली माणूस यांत कोणता मोठा फरक आहे ? (९) ' कृत्रिम निवड ' म्हणजे काय ? कोणते चमत्कार त्यामुळें घडून आले आहेत. ? (१०) आजच्या पुराव्यांवरून मागील इतिहास कसा शोधून काढतां येतो ? (११) रवी-दिनू या छोट्या संशोधकांनी कसली यादी तयार केली ? त्यांतून मामांनी काय काय कयास बांधले ? (१२) ' अवशेष अवयव ' ' जाणीव ' ' अवशेष बुद्धी ' यांचे अर्थ सांगा व कांही उदाहरणें घेऊन स्पष्टीकरण करा. (१३) प्राण्यांनी आपल्या अवयवांची नैसर्गिक निवड कां व कशी केली ? (१४) ' उपजत बुद्धी ' म्हणजे काय ? ती प्राण्यांमध्यें कशी तयार होते ? (१५) ' उपजत बुद्धी ' च्या उपयोगानें यांत्रिक हालचाली कशा होतात ? (१६) माणसाला ' उपजत बुद्धी ' असते का ? त्याच्या कोणत्या कोणत्या हालचालींमध्यें ती दिसून येते ? (१७) पशू व माणूस यांच्या ' उपजत बुद्धी ' त कसला फरक असतो ? कां ? उपजत बुद्धीचा माणसाला कांही उपयोग असतो का ? कसा ? (१८) माणसाला कधीं शेंपूट असतें का ? स्पष्ट करा. (१९) आज माणसाला शेंपूट आहे कां ? कोणते ? (२०) माणसाचें शेंपूट दिवसेंदिवस झडत आहे कीं वाढत आहे ? कसें ? तें लौकर लौकर झडून जावें म्हणून आपण काय केलें पाहिजे ? (२१) माणसाची नवीन प्रकारची उपजत बुद्धी कोणती ? (२२) ही नवीन उपजत बुद्धी कशी प्राप्त होत आहे ? कशी वाढत आहे ? (२३) पूर्वीचा शेंपूटवाला माणूस व भावी काळांतला नव्या उपजत बुद्धीचा माणूस यांच्यातला फरक स्पष्ट करा. (२४) ' हें माणसाचें शेंपूट चार दिवसांत कधीं गळून पडणार नाही ' असें मामा अखेरीला कां म्हणाले ? तें पटून रवी-दिनू त्यापुढें काय करणार होते असें तुम्हाला वाटतें ?

# माणसाचें शेंपूट !–

## १—' सुट्टी ! सुट्टीऽ ! '

' मे महिन्याची सुट्टी !' रवीला केवढी हौस वाटत होती. कारण, सुट्टी झाली, कीं, अभ्यासाचा जंजाळ नाहीं; शाळेची गडबड नाहीं; रोजच्या अभ्यासाचा पाठीमागें ससेमिरा नाहीं–' एकूण काय ?—अगदीं मजाऽच मजाऽ ! सकाळीं खेळूं, दुपारीं खेळूं; आणि घराच्या मागल्या पुढल्या अंगणांत, चांदण्या रात्रीं गप्पा मारूं !'

...' कधीं वडिलांबरोबर मागल्या वाडींत जाऊन तिथल्या कलमांचे तयार आंबे झाडावरून उतरवूं; त्यांची पेंड्यांमध्यें उंच अढी घालूं; मग आंब्यांच्या अढींमागून अढ्या पिकूं लागल्या, कीं, मधून मधून घरांत आंबरस हा करायचाच ! त्यासाठीं, चांगले पायरी आंबे धुवून, एका मोठ्या पातेल्यांत रस काढत बसायचं; त्यावेळीं हौसेनें दोन दोन तास हाऽ एक मोठा पसारा मांडायचा ! '...

'...कधीं आपल्या बैलगाडींत बसून, संध्याकाळीं अगर रात्रीं,..जत्रेच्य निमित्तानें लांबलांब फेरफटके करायचे; त्यावेळीं, गाडीवरच्या गोवारीगड्याल हळूंच वशिला लावायचा; म्हणजे काळेकाबरे बैल हांकायला पागा हातांत घेत येतील !...'

आणि हें नि तें नि तें;...असले त्याचे मनांत खूप बेत चालले होते.

पण शेवटीं, त्याच्या खेडेगांवीं, ( नाशकाहून, मुंबईहून, ठाण्याहून, ) सुट्टींत म्हणून यायची सारी बाळगोपाळ-पाहुणे मंडळी, या ना त्या कारणामुळें आलीच नाहींत. त्याचा त्यामुळें खूपच हिरमोड झाला.

नाहीं म्हणायला ( त्याचा मुंबईचा दोस्त ) दिनू तेवढा आला होता. दोघेही याच वर्षी पांचवींत गेले होते. ‘ आमचं फ्रेंच नि तुमचं संस्कृत ’ म्हणून दोघेही हमरीतुमरीनें भांडत. तरीपण ते दोघेच किती म्हणून नि काय काय म्हणून खेळणार ?

आठ दिवसांत, साऱ्या खेळांचा नि नेहमीच्या गप्पांचा त्यांना साहजिकच कंटाळा आला. दुपारचं त्यांचं भर उन्हातान्हांतलं सैरावैरा भटकणं तर कमीच होऊं लागलं. घरांतील जुनीं नवीं मासिकंही ( जांभया देत कां होईना ) त्यांनीं आतांपर्यंत चाळून संपविलीं होतीं.

शेवटीं, गेले कांहीं दिवस तर भरपूर जेवायचं नि दुपारचे चांगले तीन चार तास ताणून द्यायचं; असा त्यांनीं नवा उपक्रम आरंभला होता.

अजूनही निम्मी सुट्टी उरलेली ! आतां ती घालवायची कशी, हाच मोठा थोरला प्रश्न मधून मधून सारखा उभा रहात होता, त्यांच्यापुढें !—

## २—‘ कार्यक्रम !’

त्या दिवशीं तर हवेंत खूपच उष्णता होती. त्यांत पुन्हां आंबरसपुऱ्या, हिरव्या आंब्याच्या फोडी घातलेली रसाचीच आमटी, केळ्याचे काप, वालाच्या डाळिंब्यांची उसळ, असं अगदीं भरपूर चवदार-चमचमीत जेवण दुपारीं बारा साडेबाराला झालं होतं.

रवि नि दिनू, जेवणानंतर बैठकीजवळ जाजमावर लोळत, गप्पा मारीत पडले होते ! ऐदीपणें पडून एकमेकांच्या शाळेच्या मोठेपणाबद्दल गमतींत उकाळ्यापाकाळ्या काढतां काढतां, त्यांना केव्हां डारडून झोंप लागलीं, तें समजलं सुद्धां नाहीं त्यांना.



“ वाऽरे पोरांनोंऽ !—झोंपा काढण्याचा उद्योग चालला आहे काय तुमचा ? उत्तमच उपयोग करतां कींऽ सुट्टीचाऽ ! ” मुंबईहून आलेल्या रवीच्या मामांचा आवाज एकदम कानीं पडला नि रवी खडबडून जागा झाला.

त्यानें दिनूला हातानें हलवून उठवलं व आपल्या कपाळा–मानेवरून निथळत असलेल्या घामाच्या धारा (घामानें ओल्या झालेल्या सदऱ्यानेंच) पुसत, त्यानें एकदां आळस दिला नि झोकांच्या खातच तो उभा राहिला. मग कपडे काढून ठेवत असलेल्या मामांकडे जरा अपराधी मनानें त्यानें एकदा पाहिलं व तो चूळ भरायला घरामागल्या विहिरीवर झिंगल्यासारखा पडतच निघून गेला.

‘आधीं पत्र नाहीं, कांहीं नाहीं; आज मामा असे अचानकच मुंबईहून आले; मग काय करणार? म्हणूनच आपली अशी थोडी फजीती उडाली!’ या विचारांबरोबरच, ‘ मामा आले ’ या मुख्य कल्पनेनें, रवी मनांत खूप खूषहि झाला होता.

आणि मग त्याला वाटलं-‘ आतां आपल्याला चारआठ दिवस मामांबरोबर हव्या तेवढ्या गप्पा मारतां येतील;....त्यांना सत्रा प्रश्न विचारतां येतील; त्यांच्याबरोबर लांब लांब फिरायलाही जातां येईल ! ’

या सर्व भावी गोष्टींच्या विचारांनीं तर त्याला एक नवाच हुरूप आला होता. विहिरीच्या काढलेल्या कळशीभर ताज्या पाण्यानें त्यानें तोंड साफ धुतलं; थोडं गार गार पाणी पिऊन् व थोडं डोक्यावर शिंपडून त्याला आतां चांगलीच हुषारी आली; आणि मग दोन उड्यांत तो स्वयंपाकखोलींत जाऊन मामांजवळ बसला देखील.

## ३—घेई झोंपा-तो नर मेला !

मामा पाटावर बसून, चहा घेत घेत आईबरोबर गप्पा मारीत होते. रवीला आंत आलेला पहातांच, ते हसून पुन्हां खोंचून म्हणाले-“ अरे वाःऽरे वा, रवीऽ !-उन्हाळ्याची मोठी सुट्टी घालवायचा प्रोग्राम तर छानऽच आंखलेला दिसतोय् तुम्हीऽ ?—”

मामांच्या त्या प्रश्नांतील टोमणा रवीच्या पटकन् लक्षांत आला; तरी, नुकत्याच जवळ येऊन बसलेल्या दिनूकडे एकदां पहात, रवी त्यांना ओशाळून म्हणाला, "वेळ जातां जातऽच नाहीं!—मग काऽय करणार, मामाऽ?—कंटाळाच येतो अगदीं सुटीचा—आज जेवणही आईनें झकास केलं होतं!—मग आम्ही झोंपलोंऽ,...झालं!"

"हो, होऽ तऽर! पण गेले चांगले पांच सहा दिवस अगदीं अस्संऽच चाललंय् कीं तुमचंऽ!" त्याची आई मामांसमोरचा कप उचलून घेत आपल्या भावाला पुढें म्हणाली, "अरेऽ हे एकदां झोंपले नाऽ, कीं, दुपारच्या चहा-कॉफीला ओरडूनही उठणार नाहींतः! अगदीं तिन्हीसांजेला जांभया देत जागे होतात मग,...सारख्या ससेमिन्यामुळें माझ्या!—"

"अग, मग त्याला कोण काय करणार!..रोजच जेवण छानदार करत असशील तूंऽ, ताईऽ!—रवीचं सर्टिफिकेटच आहे तुला!" मामा रवीकडे जरा खोंचून हंसत म्हणाले. त्याची आईहि हंसली.

रवी मात्र या दुसऱ्या टोमण्यानें अधिकच ओशाळला.

तेवढ्यांत मामा म्हणाले-"अरेऽ वेळ जात नाहीं, म्हणजे रेऽ काय?-नि **कंटाळ्याचा तरी कधीं कंटाळा नाहीं कां येत?—खरी गोष्ट अशी आहे, कीं, मनुष्य एकदां पहायला शिकला, म्हणजे, त्याला झोंपायलाहि वेळ मिळत नाहीं!—उलट, तो आळशीपणानें झोंपूं लागला, कीं, झाला गोंधळ!—त्याचं शेपूट मात्र दिवसेंदिवस वाढतच जातं! अगदीं मारुतीच्या शेंपटाइतकंऽ लांऽब लांऽब!—"**

"चलाऽ; कांहीं तरीऽच! माणसाला काय शेंपूट असतं वाटतं?" रवी हंसून म्हणाला; त्या न्याऱ्या कल्पनेनें दिनूही खुसुंखुसूं हंसत होता.

"म्हणजेऽ? माहीत नाहींऽ? माणसाला शेंपूट असतं तऽर!" मामा स्मित करून, एक कोडं निर्माण करीत गंभीरपणें म्हणाले.

"चलाऽ! तुम्हीऽ पाहिलं आहेऽ?" मामांचं तोंड बंद करण्यासाठीं रवीनें त्यांना रोखठोक सवाल टाकला.



"हो होऽ!-तुम्ही झोंपा न काढतां तें पहायचं ठरवलंत, तर तें तुम्हाला सुद्धां दिसेल!" मामा हंसून पुढें म्हणाले, "पण पहिली गोष्ट पहायला शिकणं!"

## ४—पाहण्याची कला.

"म्हणजे? शेंपूट पहायलाऽ?" इतका वेळ गप्प बसलेला दिनू जरा आश्चर्यानें पण हंसत म्हणाला; त्याचा त्या गोष्टीवर विश्वासाच बसत नव्हता.

"पण तें पहायचं म्हणजे तरी कसंऽ, मामा?" रवीनेंहि आश्चर्य व्यक्त केलं व मग हंसून म्हटलं-"आमची आपली चेष्टा करतां आहां तुम्ही, झालंऽ! माणसाचं शेंपूट पहायचं म्हणे! कांहींऽ तरीऽच!"

आपल्या दादांना रवी घाबरत असे, असं नाहीं; तरी पण, तो त्यांच्याशीं जरूर तेव्हां अगदीं मोजकंच बोले. उलट, मामांबरोबर बोलतांना मात्र त्याला अगदीं मोकळं वाटे. नि तसा एकदां तो बोलायला लागला, कीं, त्यांच्याशीं तो खूप ऐसपैस बोलत राही. अशावेळीं, मामाहि त्याला अगदीं बरोबरीच्या एखाद्या मोठ्या माणसासारखंच वागवीत असत नेहमीं.

"अरेऽ चेष्टा नाहीं! मी अगदीं खरंऽ खरंऽ तेंच सांगतोंय्!—आपण विचारपूर्वक पाहूं लागलों, कीं, माणसाचं शेंपूटही आपल्याला दिसतं!—पण नीट पहाऽयलाच शिकलं पाहिजे ना..प्रथम!" मामा पाटावरून उठून ओटीकडे चालूं लागले व जातां जातां हंसत पुढं म्हणाले,—"**—पहायचं म्हणजे दुसरं नाहीं कांहीं;..अगदीं आपल्या भोंवतींच पहायचं! मात्र चांगलं डोळे उघडे ठेऊन पहायचं, होऽ! अगदीं मनापासून नि विचार करीत पहायचं! पण पहायचं म्हणजे नुसत्या डोळ्यांचा उपयोग करायचा, असंहि नाहीं. आपल्या सर्वच इंद्रियांचा नि बुद्धिचाहि कुतूहलानें उपयोग करायचा!—समजलंऽ?"—**

"पण भोंवतीं पाहिलं म्हणून काय झालं? त्यानें आपल्याला मुळांतच नसलेलं माणसाचं शेंपूट होऽ कसं दिसणार?" रवीनें मामांना अडवलं.

"अरेऽ, आपल्याभोंवतीं पाहूं लागलं, कीं, आपल्या शेंपटाचे सारे पुरावेच सांपडतील कीं, आपल्याला !...मग आज सहजासहजीं दिसत नाहीं, तेंच हळूहळू दिसूं लागेल !–" मामा माजघरांत येऊन म्हणाले. "आणि असं नेहमीं विचारपूर्वक पाहिलं, कीं, लोकांना जें दिसत नाहीं तेंच अगदीं प्रत्यक्ष दिसूं लागेल आपल्याला ! आणि मग तुम्हीच म्हणाल– 'खरंच रेऽ खरंच ! तेंऽ पहा माणसाचं शेपूट !'–"

"याला काय पहाणंऽ म्हणायचं, होऽय ?" रवीला मामांचं म्हणणं नीट पटत नव्हतं; त्यांच्याबरोबर ओटीकडे जात तो म्हणाला.

"हो! मऽग? पहाणंऽच हेंऽ! सर्व इंद्रियं एकाग्र करून या विचारपूर्वक पहाण्याला आपण 'निरीक्षण' म्हणूं या, पाहिजे तर !–" मामा अंगणांतील बांकावर बसून म्हणाले. "असलंऽ निरीक्षण तुम्हांला जमतंऽ कांऽ? येतं नीट पाहायला तुम्हाला ?"

"म्हणजेऽ? आम्ही असं कधींऽच पहात नाहीं वाटतंऽ?" रवी त्यांच्या–जवळ बसून आव्हानाच्या स्वरांत म्हणाला.

## ५—प्रश्नांची सरबत्ती !

"पहातां नाऽ? ठीऽक !–बरं बरं...पहातोंच तर मीहि आतां...तसं तुम्हाला पहातां येतं कीं नाही तें !" मामा एकदां हसले; ते क्षणभर थांबले; नि मग त्यांनी प्रश्नांची फैर सोडली– "सांगा बघूं–प्रश्न नंबर एक—तुमच्या घरांतल्या जिन्याला पायऱ्या किती आहेत ? प्रश्न दुसरा—एका केळीच्या झाडाला लोंगरं किती येतात ? नंबर तीन—गणपतीची सोंड कुठल्या बाजूला वळलेली असते ? नंबर चार–पांढरे ढग आकाशांत कोणत्या दिवसांत फिरतात ?- नंबर पांच—पावसाळ्यांत तुमच्या विहिरीचं पाणी कितव्या पायरीपर्यंत वर येऊन पोहोंचतं ?–प्रश्न सहा—तुमच्या पाणराहाटाला आज एकूण बोंड्या किती बांधल्या आहेत ? पावसाळ्यांतहि तेवढ्याच असतात कां ?– नंबर सात—कुत्र्याच्या व मांजरांच्या नखांच्या रचनेंत फरक काय असतो ?–कुत्रं



नेहमीं बसतांना काय करतं ?—मांजर रागावलं कीं काय करतं ?—गाईचं वासरूं जन्मल्यावर किती महिन्यांनी, किती दिवसांनीं चालूं लागतं ?–आणि शेवटचा प्रश्न, नंबर दहा—म्हातारा बैल म्हणजे किती वर्षं वयाचा बैल ?–"

"अबबऽ ! किती प्रश्न एकदमच विचारतां होऽ, मामा, तुम्हीऽ?" खरं म्हणजे, रवी गोंधळला होता; पण वर वर उसनं अवसान आणून तो हसत म्हणाला—"पण मी म्हणतों,...या साऱ्या प्रश्नांचा त्या माणसाच्या शेंपटाऽशीं काय संबंध बुवाऽ ?"

"हें पहाऽ! अशी फसवाफसवी मुळींच नाहीं चालणार–माझ्याकडे !" –मामा रवीला जरा लटक्या दमांत घेऊन पण हंसतच म्हणाले, "मी विचारलेले सारे प्रश्न तुझ्या परिचयाच्या, तुझ्या माहितींतल्या गोष्टी-बाबतचेच आहेत नाऽ? झालं तर ?—पण त्या गोष्टींकडे मी म्हणतों तशाप्रकारें तूं पाहिलेलं असलंस, तरच तुला पटकन् सांगतां येतील त्यांचीं उत्तरं !–नाहींतर नाहीं. आणि **तसं पाहण्याची खरोखर संवय असली तरच तुला माणसाचं शेंपूटही पटकन् दिसेल !**"

## ६—डोळे असून आंधळे!—

थोडा वेळ रवी-दिनूकडे पहात थांबून, मामा त्यांना हंसत पुढं म्हणाले– "पण मग,.. आतां हातच्या कांकणाला आरसा कशाला ? मघांतल्यापैकीं तीनच प्रश्न आतां पुन्हां विचारतों हं मी, तुम्हाला !—एका केळीला लोंगरं रेऽ किती येतात ?—"

रवी क्षणभर घुटमळला. धीर आणण्यासाठीं त्यानें एकदा जवळ बसलेल्या दिनूकडे हळूच पाहिलं; तरी पण त्याबाबतींतल्या अज्ञानामुळें त्यानें चाचरत चाचपडतच उत्तर दिलं–"त्यांत कायऽ? येतात तीनचार !"

मामा मोठमोठ्यानें हसत म्हणाले–"पाहिलंऽस ?–एक उत्तर तर सपशेल चुकलास !–एका केळीला फक्त एकच लोंगर येतं !–पण तूं चौकस

बुद्धीनें तें पाहिलंच नाहींस, त्याला कोण काय करणार ? आणि स्वतःच्या परसांतल्या केळीचीं लोंगरं ज्याला दिसत नाहींत, त्याला माणसाचं शेंपूट रेऽ कसंऽ दिसणार ? बरंऽ आतां दुसरा साधाच प्रश्न हंऽ ! गाईचं वासरूं जन्मानंतर किती दिवसांनीं चालूं लागतं ?–तूंऽ सांग रेऽ दिनू ? ''

दिनू गालांतल्या गालांत हंसून, रवीकडे पाहूं लागला. पण उत्तर मात्र देईना. त्याचा गोंधळच उडाला होता.

" अहोऽ त्या मुंबईकराला हें काय ठाऊक असणार, मामाऽ?'' रवीला माहिती होती, म्हणूनच, एकदम तो तोऱ्यांत म्हणाला–"तो आपलं सांगेल, कीं, लहान मुलासारखं तें चिमुकलं वासरूंही वर्षाचं झाल्यावरच रांगूं लागतं, म्हणून !—त्याला काय माहीत–महिने नाहींत नि दिवसहि नाहींत–केवळ चारसहा तासांतच तें चालूं लागतं, हेंऽ !''

" शाब्बाऽस !–बरोबर ! आतां हेंच बघ हंऽ–दिनूनें पाहिलेलं नसलं तरी तूं हें नीट पाहिलेलं आहेस ! आणि म्हणूनच तर तें पटकन् मला सांगूं शकलास तूं ! मग तसंऽच मी माणसाचं शेंपूटसुद्धां पाहिलंयू ! म्हणूनच तर तुम्हाला तें सांगूं शकतों मी ! " मामा रवीला हंसत म्हणाले.

रवी–दिनू दोघेही अविश्वासानें त्यांच्याकडे पहात हंसत होते.

" बऽरं ऽ, आतां आणखी एकच प्रश्न, हंऽ"-मामा क्षणभरानें म्हणाले; "एखादं कुत्रं बसतांना काय करतं रेऽ ?–काऽय झालं म्हणजे तें रडूं लागतं ?–तूंच सांग, रवीऽ!"

यावेळींहि रवी पुन्हां लटपटला; तरी नुसता जाणतेपणाचा खोटा आव आणून तो पटकन् म्हणाला, " तें ना ? आपले पाय दुमडतं;...नि आपल्यासारखंच कांहीं दुखत खुपत असलं कीं मोठमोठ्यानें रडतं !–त्यांत काय..."

" पाहिलंऽस !–ठाऊक नसलं, कीं, माणसाची अशी बनवाबनवी सुरूं होते ! " मामा पुन्हां त्याला दटावीत म्हणाले, " कुत्र्याच्या रडण्याचा त्याचा दुखण्या-खुपण्याशीं कांहीं एक संबंधं नसतो. त्याला 'रडणं' असं आपण म्हणतों, आणि आपल्याला तें उगीचच अशुभही वाटतं. पण तसं ओरडणं हा त्याचा



नैसर्गिक मनोधर्मच आहे. नि तें बसतांना काय करतं तें तूं पाहिलेलंच नाहींस;.. माझी खात्री आहे !..नाहीं तर, तें आधीं सातआठ वेळां आपल्या अंगाभोंवतीं गरगर फिरतं नि मगच बसतं, असंच पटकन् सांगितलं असतंस तूं मला!—"

" काऽय ? गरगर फिरतं अंगाभोंवतींऽ? असं कां हो तें करतंऽ मामाऽ?' मध्येंच दिनूनें उत्सुकतेनें विचारलं.

## ७—कुतूहल.

" पाहिलंत ? आतां कुठे हे असे प्रश्न सुचूं लागले तुम्हाला. आणि असं होऊं लागलं, कीं, माणसाचं शेंपूटही हळूहळू दिसूं लागतं ! हीच ती पहाण्याची पुढली पायरी !-"मामा कांहीं वेळानें हंसून म्हणाले, " **असं पाहूं लागलं, कीं, आपल्याला अनेक गोष्टी दिसतात. अर्थात् त्यांचा अर्थ लागलीच समजला नाहीं, कीं, आपली त्याबाबतींमधील उत्सुकता खूप वाढते-ते मनातलं कुतूहल वाढलेलं असलं, कीं, हे पुढले प्रश्नहि मनांत उभे रहातात!..ते मग सोडवायचे आपण,.. जाणत्या माणसाला विचारून...**"

" नि त्यांनांच सांगतां नाहीं आलं तऽर ? " दादा–आईचा पूर्वीचा थोडा अनुभव जमेस धरून, रवी आपले बेरके डोळे मामांकडे वळवून म्हणाला–" आकाशांत गडगडतं कां म्हणून नुसतं विचारलं, कीं देतात थापा ठोकून—'म्हातारी हरभरे भरडतेयू तिथं बसून,' म्हणून !—"

## ८—' पाहायला शिका !'

रवी मोठ्या माणसांची चेष्टा करीत होता; पण त्यांतील सत्यांश थोडा पटून–मामा हसूं लागले; मग क्षणभरानें ते म्हणाले, " संगळींच मोठीं माणसं अशा थापा ठोकणार नाहींत, रवीऽ! कांहीं निदान नीट समजावून सांगतील!"

" पण त्यांऽना ठाऊक असलं तरऽच ना, मामाऽ ? " रवी जरा कुर-

कुरत म्हणाला, " मोठ्या माणसांना आपलं हिशेबठिशेब करत राहिल्यानंतर, वेळच असतो कुठं ? आम्हाला समजून सांगायच्या ऐवजीं...ती आमच्या अंगावरच उगीच ओरडणार !..त्यापेक्षां त्यांना कांहीं न विचारलेलंऽच बरंऽ!"

**" अरेऽ मग सर्वांत मोठे नि जाणते हुकमी हुशार मित्र आहेत कीं !–ते म्हणजे,...ते प्रश्न सोडवणारीं चांगलीं पुस्तकं !** त्यांना वाटेल तेव्हां वाटेल तें विचारायचं आपण !" मामा हसून म्हणाले—" हवीं तेवढीं पुस्तकं आहेत असल्या गोष्टी सांगायला !—"

" पण मऽग आम्हाला तसलीं इंग्रजी पुस्तकं वाचतां कुठंऽ येतात ?– नि आहेत कुठं आमच्याकडे ? " रवी तक्रारी स्वरांत म्हणाला.

" अरेऽ पण मग तुम्ही प्रश्न विचारून विचारून भंडावूं लागलांत, कीं, तीं मोठीं माणसंच झक्त या पुस्तकांना प्रथम विचारतील; नि मग आपसूक तुम्हाला प्रश्नांचीं उत्तरं मिळतील !–पण तुम्हाला असलं कुतूहल तर आधीं वाटलं पाहिजे नाऽ प्रत्येक गोष्टींचंऽ ! असले प्रश्न मनाला सुचले पाहिजेत ! मन जागं पाहिजे !–तेव्हां जमणार हें !...म्हणूनच, मी म्हणतों,...तेवढ्या-साठीं तुम्हीं स्वतः पहायला शिका! तें तर शिकलं पाहिजे सगळ्यांत आधीं !"

" आहे खरीऽ गंमत !" रवी-दिनू एकदम उत्साहानें म्हणाले—

" गंमऽत ?–अरेऽ हें तर कांहींऽच नाहीं !–खूऽपच गंमत असते ! " मामा त्याला उत्तेजन देत म्हणाले; " पण तुम्ही काढणार दिवसाहि झोंपा !– मऽग ?...अरेऽ, ही पहायची चटक एकदां लागली माणसालाऽ, कीं, मग दिवसाढवळ्या झोंपा नाहींत सुचणार होऽ त्यालाऽ !— "

मामा पुन्हां आपल्या दुपारच्या झोंपांपर्यंत येऊन पोहोंचले, याची जाणीव होऊन, रवी एकदम खजील झाला.

दिनू इतका वेळ एकाच विचारांत गढला होता; तो एकदम भानावर येऊन म्हणाला–"असंऽ कां होऽ करतं तें कुत्रंऽ, मामा ?"

"पण तसं कशाला ?–आतां तुम्ही घरांत नि घराभोंवतालचे इतके पाळीव प्राणी पहातांच आहांत ना नेहमीं ?–मग आतां जरा आणखी नीट



पहा– त्यांचंच आधीं तुम्ही चांगलं निरीक्षण करा, पुढले दोन तीन दिवस ! अगदीं सकाळपासून संध्याकाळपर्यंत. बरंऽ कां ?– सारखं त्या मागंच असायचं ! नि मग, मला एकदमच काय ते प्रश्न विचारा– तुम्हांला जें जें समजणार नाहीं, त्या बाबतचे ! मी आहेच इथं चार पांच दिवस !"

"पण मग तरी दिसेल कां आम्हाला तें माणसाचं शेंपूट ?– तुम्हीं दाखवाल ?"– रवी–दिनूनीं एकदम रोखठोक सवाल केला.

"अगदींऽ ! नक्कीऽच दाखवीन !!" मामाहि हसून आव्हान स्वीकारत त्यांना म्हणाले.

दिनू–रवी दोघांनाहि त्यामुळें एक नवाच हुरुप आला. त्यांनीं तत्काळ पुढचे दोन दिवस सारखं पहाण्यांत घालवायचे, असं एकदम ठरवून टाकलं आपल्या मनाशीं !

कांहीं झालं तरी...त्यांना माणसाचं शेंपूट हें पहायचंच होतं !–

## ९—शेंपटाच्या शोधांत–

त्याच दिवशीं रात्रीं, जेवतांना दादांबरोबर मामा इकडच्या तिकडच्या गप्पा मारीत होते; आई वाढतांना मधूनमधून बोलत होती; पण मामांच्या गप्पांकडे रवीचं जरादेखील लक्ष नव्हतं.

त्याच्या डोक्याभोंवतीं सारखं माणसाचं शेंपूटच भलंमोठं वेटोळं घालून बसलं होतं !—

त्यांच्या घरांत दोनतीन छानदार माजरं होतीं. जेवायला पंगत मांडलीऽ रे मांडली, कीं, 'मॅंऽव मॅंऽव' करत, ती नेहमीं जवळ येऊन बसत. आज त्याच रोजच्या साऱ्या हालचाली 'पाहण्यांत'– विशेषतः त्यांच्या पिंजारलेल्या शेंपट्यांकडे अगदीं निरखून निरखून पहाण्यांत–रवी पार गुंग झाला होता !

जेवण झाल्यावर, विहिरीजवळच्या एका मोठ्या दगडावर त्यांच्या गड्यानें खरकटं–भात वगैरे उरलेलं सर्व घातलं. त्याबरोबर त्यांच्या घराभोंवतीं

पहारापाळत करणारीं सारीं कुत्रीं कशीं गुरगुरत-ओरडत आलीं; शेपट्या हलवत-वखवखत त्या दगडाभोंवतीं तीं कशीं एकमेकांवर तुटून पडत खात होतीं, तेंच पहाण्यांत रवीचा पुढला अर्धा तास गेला.

मग तो गुरांच्या बेड्याकडे गेला. तिथं बाळ्या गड्यानें गवताच्या गुंड्या सोडून गाई-म्हशी नि बैलापुढें रात्रींसाठीं टाकल्या.

कांहीं गुरं पुढले पाय दूमडून, बसल्या बसल्या, आपले जबडे कांहींसे वर्तुळाकार फिरवीत, अर्धवट डोळे मिटून रवंथ करीत होतीं. त्यांच्यासमोर उभा राहून त्यांच्या शेपट्यांकडे पहात, माणसाच्या शेपटीबद्दल आपल्या मनाशींच तो विचार करीत होता.

शेवटीं, मामाच अंगणांतून मोठ्यानें म्हणाले-"दुपारच्या झोंपा काढतां, म्हणूनच रात्रीं लौकर झोंपा येत नाहींत तुम्हाला ! होऽ ना रेऽ रवी-दिनू ?"

आतां पुन्हां मामा आपल्याला मुद्दामच थोडे डिंवचीत आहेत, हें रवी-दिनू दोघांच्याहि लक्षांत आलं. पण ते कांहीं न बोलतांच, अंगणांत टाकलेल्या आपापल्या बिछान्यावर जाऊन विचार करीत पडले.

## १०—नवे डोळे

'कॉक् कॉ कॉऽक् कॉऽ' असा पहांटे आवाज झाला; तसा आपल्या मनांतल्या शेंपटाच्या नव्या ध्यासामुळेंच, रवी खडबडून जागा झाला.

त्यानें भोंवतीं पाहिलं. चांदणं अजून चांगलं स्पष्ट दिसत होतं. चंद्र पश्चिमेला येऊन टेंकला होता; व झाडांच्या फांद्यांमधून निरनिराळ्या आकारांच्या ठिपक्याठिपक्याच्या भुरकट सांवल्या साऱ्या अंगणांत पसरल्या होत्या. वाऱ्याच्या एखाद्या झुळकीबरोबर त्या मधूनमधून मंदमंद हलतहि होत्या !-

मध्यरात्रीं एकदां लांबवरून कोल्ह्याचं ओरडणं रवीला ऐकूं आलं होतं. प्रथम त्याच्या घराजवळपासचीं कुत्रीं मोठमोठ्यानें भुंकूं लागलीं. पण मग एका कुत्र्यानें हळूच एक रडका स्वर काढला; व त्याच्यामागून चारदोन



कुत्रीं हेल काढून रडूं लागलीं. तो एकच एक गोंधळ त्या चोहूंबाजूच्या शांततेंत दुमदुमून अगदीं भयानक वाटला होता त्याला !—

तेवढ्यांत, त्याच्या जवळच झोंपलेले त्याचे वडील-दादा-एकदम उठले होते. एक दगड घेऊन त्या कुत्र्यांवर जोरानें भिरकवीत ते ओरडले होते... " हड् हड् !...दळिद्रीऽ शिंचींऽ !-अशुभ नाहीं तेंऽ !—"

पडल्या पडल्याच, रवीला मामांचे संध्याकाळचे शद्ब आठवले होते; त्याला किती तरी वेळ झोंपच येत नव्हती.

कुत्र्यांची ती ओरड थांबल्यावर, गुरांच्या बेड्यांतून कांहीं तरी ठोकल्याचा आवाज त्याच्या कानीं पडला. प्रथम तो मनांत घाबरला; धडधडत्या छातीनें तो कानोसा घेत होता. 'चोरबीऽर तर नव्हेऽत ना ?'-पण मग त्याच्या लक्षांत आलं, कीं-गाई-म्हशी-बै या गोठ्यांतल्या गुरांपैकीं कोणीतरी, आपलीं शिंगं दावणीजवळच्या लांकडावर आपटत असावं. त्यांनीं आपलीं शिंगं अशीं कां आपटावींत, हा एक मोठा प्रश्नच पडला होता रवीला. आणि त्याचा विचार करतां करतां, पुन्हां त्याच्या डोळ्यावर झोंपेची झांपड आली होती.

## ११—नवीं दृश्यं !

आणि आतां तर तो पहांटे कधीं जागा न होणारा मुलगा; कोंबडा आरवला तसा एकदमच खडबडून जागा झाला होता. त्याचं त्यालाच आश्चर्य वाटलं प्रथम, कीं,-" **आज आपल्या कानांना इतक्या लहानसान गोष्टीही इतक्या स्पष्ट ऐकूं कशा येऊं लागल्या आहेत ? ?** "

तेवढ्यांत, दिनूही जागा झाला. रवीनें हळूच त्याला उठण्याची खूण केली व ते दोघे परामागच्या विहिरीकडे जाऊं लागले.

अंगणाच्या कडेजवळ, ठिकठिकाणीं, रात्रीं भुंकणारीं कुत्रीं, पाय ऐसपैस पसरून झोंपलीं होतीं; त्या दोघांची चाहूल लागतांच, त्यांनीं एकदां माना वर केल्या, त्यांच्याकडे मिचमिच्या डोळ्यांनीं पाहिलं, नि पुन्हां तीं होतीं तशींच झोंपलीं.

बेड्याजवळून जातांना, गायी-म्हशी जागेवर बसून, सारखं रवंथ करीत असलेल्या त्यांना दिसल्या. त्यांची ती अव्याहत चाललेली 'गिरण' पाहून रवीला मनांतल्या मनांत मौज वाटली.

तेवढ्यांत, विहिरीजवळच्या एका बैठ्या झाडावरून पुन्हां एकदां एक कोंबडा आरवला. त्यानें पंख झाडून फड्‌फड् आवाज केला. जवळच्या दुसऱ्या एका झाडावरून एक दोन कोंबडयांनीं उड्या मारल्या.

तेवढ्यांतच, त्यांना दिसलं-पलीकडून त्यांच्या गड्यांच्या इतर कोंबड्याहि आपल्या पिलांच्या लेंढारांसह, इकडे तिकडे बांखरत, आपले ठिकठिकाणचें खाद्य टिपत-गिळत चालल्या होत्या. त्या पिलांचा गोंधळी चिंवचिंवाट व कोंबड्यांचा 'काऽक्' 'कॉऽक्' असा घशांत घुमणारा संथ आवाज त्यांना सारखा ऐकूं येत होता.

तोंच, दिनूच्या अंगांत अगदीं अकस्मात् संचारल्यासारखं झालं. त्यानें एकदम हात वर केले; व त्या कोंबड्याच्या लटांबरावर झडप घातल्यासारखी हालचाल करून "हाऽ श्यू ऽ-" असा आवाज केला.

त्याबरोबर "कॉक्-कॉक्-कॉक्-कॉऽक्" असा मोठ्यानें आवाज करत, ती कोंबडी व तिच्यामागून धडपडत तिचीं तीं इवलालीं पिलं, सारीं दूर पळून गेलीं.

दोघेहि मोठ्यानें हंसले. पण कोंबडीचा मघांचा 'कॉक्' असा एकाक्षरी संथ आवाज व आतांचा पळतांनाच घाबरला अनेकाक्षरी ऱ्हस्व आवाज यांतील फरक रवीच्या निरीक्षणांतून यावेळीं सुटला नाहीं.

मागल्या दाराशीं विहिरीजवळच्या पायरीवर एक मांजर पाय दुमडून बसलें होतें. रवी पोहऱ्यानें पाणी काढूं लागतांच, तें उठून दिनूच्या पायाला अंग घसटत लाडीगुडीनें 'म्यँऽव, म्यँऽव' करूं लागलं.

प्रातर्विधी आटोपून ते पुन्हां विहिरीजवळ येतात, तोंपर्यंत पूर्व बाजू फटफटली होती.



आईची घरांत चुलीजवळ खुडबूड चालली होती. रहाट वाजतांच, तिनं मागला दरवाजा आंतून उघडला व पाहिलं. तर दिनू-रवी मारे तोंड धूत आहेत.

"अंऽ ! अरेऽ हे सूर्यवंशी आज पहांटेऽ कसे रे उठलेऽ ?" आश्चर्य दाखवून आई हंसत थट्टेनें म्हणाली.

"कोंबड्याच्या आरवण्याबरोबरच आज उठलों आम्ही, आई!" रवीहि जरा अभिमानानें म्हणाला.

"कालपासून आम्ही खूपसं 'पहायचं' ठरवलंय् !" दिनूनें रवीला दुजोरा दिला.

"अस्संऽ! मामांनींच कळ लावलेली दिसतेय् ही !" आई म्हणाली व हंसत हंसत पुन्हां घरांत कामाला निघून गेली.

—आणि नंतर, तो सारा दिवस कसा गेला, तें दिनू-रवींना समजलं-सुद्धां नाहीं. दुपारच्या झोंपाचे तर राहूं द्याच; पण जेवणाचीसुद्धां अगदीं मुळींच शुद्ध नव्हती त्यांना.

## १२—पाळीव प्राणी.

तरी संध्याकाळपर्यंत मामांनीं त्यांना कांहीं एक विचारलं नाहीं.

पण जेवून झाल्यावर सारे चांदण्यांत निवांत बसले, तेव्हां मामांनी हळूंच विचारलं–"काय रविराऽव, दिनोबाऽ, आज अगदीं तुमची दिवसभर जागच नव्हती ? दुपारीं झोंपलेले देखील दिसलां नाहीं ! काय ? करऽत काय होता एवढं ?"

"आम्ही नाऽ पहात होतों सारखं !" दोघेही अगदीं खुषींत येऊन मामांकडे अभिमानानें पहात म्हणाले.

"अस्संऽ ! काय काय पाहिलंत रेऽ ? मामांनीं आश्चर्य दाखवून उत्सुकतेनें विचारलं.

"सगळ्याच गोष्टी पहायला कसा वेळ मिळणार एकदम ?" रवी

थोड्या अपराधी हिरमुसल्या स्वरांत म्हणाला. “ आम्ही आपले पाळीव प्राणी तेवढे पहात होतों. ”

“ वा:! मग हें बरंऽच केलंत कीं !– **असं एकेका गोष्टीचंच निरीक्षण करावं !** ” मामांनीं त्यांना उत्तेजनात्मक म्हटलं–“ पण पाळीव प्राणी म्हणजे तुम्ही कुत्रीं, मांजरं, ढोरं, कोंबड्या,...एवढ्यांचीच पहाणी केली असेल ना ? ”

“ हो !...मऽग ? ” दिनू आश्चर्यानें म्हणाला–“ दुसरे आणखी कोणते पाळीव प्राणी असतात. ? ”

“ असतात तर !–” मामांनीं उत्तर दिलं– “ अरे, माणसांनी आपल्या सोयीसाठीं जंगली प्राण्यांना (त्यांना नवीन नि अपरिचित अशा) आपल्या परिस्थितीत आणून टाकलं; त्यांना आपला लळा लावला व आपल्याला फायदेशीर गोष्टी त्यांच्याकडून करून घेतल्या, कीं, त्यांना आपण माणसाळलेले किंवा पाळीव प्राणी म्हणतों. मग त्या दृष्टीनें, गायी–कुत्रींमांजराप्रमाणेंच घोडा, गाढव, खेंचर, गांवडुक्कर, बकऱ्या, मेंढ्या, उंट, हत्ती, असले प्राणी सुद्धां पाळीव प्राणीच नव्हेत का ? ”

“ अरे खरंऽच कीं ! ” आतां तो मुद्दा ध्यानांत येऊन रवी म्हणाला.

“ आतां चीनमध्यें किंवा आपल्या हिंदुस्थानांतल्याच काश्मीरांत, रेशमाचा धंदा चालत असतो मोठा !–हे रेशीम देणारे किडे सुद्धां पाळतातच; अंघोळीच्या वेळीं आपण स्पंज वापरतों ना ? तो एका प्राण्याचा सांगाडा असतो. कांहीं कांहीं समुद्रांत तो प्राणी आपोआप सांपडतो. पण हल्लीं मुद्दाम त्या प्राण्याची या स्पंजासाठींच उत्पत्ती व वाढ करतात ! मग हा सुद्धां एका दृष्टीनें पाळीव प्राणीच नव्हे का ? ”

“ हो, पण हे असले प्राणी आम्हाला कुठं पहायला मिळणार ? ” दिनूनें शंका उत्पन्न केली.

“ सर्वच नाहीं पहातां येणार काहीं ! ” मामा त्यांना धीर देऊन हंसत



म्हणाले–“ पण पाळीव प्राण्यांमध्यें याचीहि गणना करायला पाहिजे, एवढंच माझं म्हणणं !–”

## १३—जंगलं नि शहरं–

“ हे पाळीव प्राणी पूर्वी कुठं होते, मामा ? ” रवीनें क्षणभरानें उत्सुकतेनें विचारलं.

“ कुठें म्हणजे ? अरण्यांत !– आणि **माणसं तरी पूर्वी कुठं होती ? अरण्यांतच !** ” मामांनीं उलगडा केला. “पण ते फारऽफारऽवर्षांपूर्वी हो ! अगदी पंचवीस, तीस...पन्नास हजार, लाख वर्षांपूर्वी !–”

“ अबबऽ !–इतकीऽ ? ” दिनू डोळे मोठे करून म्हणाला.

“ अरे, याहून जास्त, वेड्याऽ !– ” मामा हंसले.

“ असं असं !– म्हणजे माणसं जेव्हां शहरांत रहायला आली, तेव्हां त्यांनीं रानांतून हे प्राणी बरोबर आणले. ” रवीनें विचार करीत स्वतःच स्पष्टीकरण केलं.

“ तुझी कल्पना बरोबर चालली; पण एका गोष्टींत फसलास बरं का तूं ! ” आपल्याकडे गोंधळलेल्या चेहऱ्यानें पहात असलेल्या रवी-दिनूंकडे पहात मामा म्हणाले.

“ तें कसं ? ” रवीनें अधिकच गोंधळून विचारलं.

“ अरेऽ शहरं आयतीं कोणी तयार कां केलीं होतीं ?–माणसं स्वतः शहाणीं होत गेलीं. तेव्हां त्यांनीच तीं तयार केलीं. प्रथम अरण्य हीच त्यांची शहरं होतीं. या रानटी प्राण्यांचीं सुद्धां तींच ‘ शहरं ’ होतीं. त्यावेळींच तर या प्राण्यांचा माणसांशीं पहिला संबंध आला. आणि त्यांच्यावर ताबा मिळवून त्यांचा उपयोग करण्याची माणसांना कल्पना सुचली ! ”

“ म्हणजेऽ ? सगळ्या प्राण्यांवर मिळवला ताबा त्यांनीं ?” दिनूनें डोळे विस्फारून विचारलं.

" छे रेऽ! जीं हिंस्र भयंकर श्वापदं होतीं, त्यांना मारूनच माणूस आपलं संरक्षण करी. आतां आज जे हे पाळीव प्राणी दिसत आहेत, ते सुद्धां असेच एकेकाळीं अगदीं माणसांचे शत्रू होते ! पण माणसानें त्यांचा आपल्या कामांत उपयोग करायचं ठरवलं; त्यांना मारलं नाही !-मग त्यांच्या हजारों पिढ्या माणसांच्या संगतींत गेल्या; नि आतां ते प्राणी अगदीं निरुपद्रवी व माणसांना फारच उपयुक्त असे झाले आहेत. तेच हे पाळीव प्राणी..."

## १४—पाळीव प्राण्यांचे जातभाई !

" म्हणजे हे सारे प्राणी आतां हिंस्र राहिले नाहींत, म्हणूनच ते पाळीव प्राणी ! हो नाऽ ?" दिनूनें उघडपणें आपलं समाधान करून घेतलं.

" तसंऽच कांहीं नव्हे, दिनूऽ " मामा त्याला सुधारत म्हणाले, "अरेऽहे निरुपद्रवी असले तरी अगदीं यांचेच दुसरे हिंस्र बांधव अजून रानटी स्थितींतच जंगलांत आहेत कीं !-"

" म्हणजे कोणतेऽ हो मामा ? "– रवीनें आश्चर्य व्यक्त केलं.

" आतां आपला अगदीं हा इमानी कुत्रा घे ! " मामा रवीला समजावीत म्हणाले. " त्याचे जंगलांतले काकोंब-लांडगे-कोल्हे-आजही तुला रानटी स्थितीत पहायला मिळतील. आणि ते समोर आले तर तुम्ही थरथर कांपायला लागाल. "

" खरंऽच ?"–दिनू जरा भेदरल्या डोळ्यांनीं मामांकडे पहात म्हणाला.

" आणि आपल्या पंक्तीजवळ बसून, जिभल्या चाटणारी एखादी निरुपद्रवी वाघाची मावशी पहा !" मामा हंसून पुढं म्हणाले. " त्या मावशीचे भाचे-जंगलांतले बिबळे वाघ !-तुमच्यावर ते आजही ताडकन् झडप घालतील!"

" आम्ही वाचलंय् त्यांच्या शिकारीचं वर्णन ! " रवीनें आपल्या ज्ञानाचं प्रदर्शन केलं मध्येंच...

"आतां हे झाले मांसाहारी पाळीव प्राणी! पण अगदीं मायाळू दिसणारी



आपल्याला दूध पाजणारी तांबू गाय ?-तिच्या देखील मावशा–आत्या आजही आहेत की जंगलात-त्या शिंगं रोखून धावत आल्या-तर तुम्हाला पळतां भुई थोडी होईल ! "

"गंमतच आहे म्हणायची !" दिनू आनंदून म्हणाला.

" त्याच्याहिपेक्षां मोठी गंमत सांगतों तुला ! आज अगदीं रुबाबदार दिसणाऱ्या घोड्याचा मूळ पूर्वज कोल्हा–कुत्र्याच्या आकाराचा होता !" मामा हंसून म्हणाले.

" काय ? ? कुत्र्याएवढा लहान घोडा ?" रवीनें मनांतलं आश्चर्य व अविश्वास दाखविला.

"तुम्ही मला वेड्यांत काढत असाल ! पण ही अगदीं खरी गोष्ट आहे होऽ" मामा पुढें सांगू लागले "गाढव हा घोड्याचाच एक चुलत भाऊ; नि लष्करांत वापरतात ना खेंचरं ! तींही माणसानें आपल्या अक्कलेचे प्रयोग करून, स्वतःच्या सोयीवार उपयोगासाठींच तयार केलेले प्राणी !"

"तयाऽर केलेलेऽ ? म्हणजेऽ ?" दिनू आश्चर्यानें ओरडला.

"हो ! तयार केलेले !- कारण घोडा व गाढव यांच्यापासून तयार झालेले प्राणी आहेत ते !" मामा त्यांना गंभीरपणें म्हणाले.

दिनूनें रवीकडे चमकून पाहिलं. रवीनेंहि कांहीं न बोलतांच एकदां नाक मुरडलं.

पण मामाहि गुपचूप दोघांकडे पहात होते ! ते सहास्य पण गंभीरपणें म्हणाले, "हे पहा ! नाक मुरडण्यासारखं लाजण्यासारखं कांहीं नाहीं त्यांत !-शास्त्रीय माहिती आहे ही ! आपणाला ती केव्हां ना केव्हां तरी समजलीच पाहिजे. या खेचरांपैकीं कांहींचा आवाज असतो गाढवासारखा; कारण, त्यांचा बाप गाढव असतो. कांहीं खेंचरं घोड्यासारखीं खेंकाळतात; कारण, त्यांचा बाप घोडा असतो. पण हे प्राणी कामाला मात्र घोडा व गाढव यांच्यापेक्षांहि अधिक दमदार, कष्टाळू नि ओझं वहाण्यास तर अधिक

ताकदवान् असतात. म्हणूनच, मी म्हटलं, कीं, माणसानें अक्कल वापरून तयार केलेले प्राणी असतात हे, असं !–"

## १५—माणसाचे प्रयोग.

"पण मग देवासारखे माणसालाहि असे चमत्कार करतां येतात?" दिनूनें आश्चर्यानें विचारलं.

"हो होऽ! अरेऽ **माणूस मोठा उद्योगी नि अक्कलवान् प्राणी आहे** !" मामा त्याला म्हणाले. "म्हणूनच तर तो एवढ्या भयंकर नि मोठमोठ्या प्राण्यांचा नि साऱ्या जगाचाच राजा झाला आहे. **त्याला वाटेल ते चमत्कार शास्त्रानें करतां येतील; आपल्या सोयीसाठीं माणसानें प्रयोग करून निसर्गालासुद्धां बदलून-वळवून घेतल्याचे अनेक दाखले आपल्याला आजहि आढळतील !**"

"अस्संऽ?" दिनूनें साशंक मनानें प्रश्न केला.

"हो तर !" मामा म्हणाले, "उत्तम भात असेल तें न खातां जमिनींत पेरतात. पुन्हां त्या पिकांतले उत्तम भात, निवडून पेरतात. तें पीक केवढं तरी तजेलदार सकस होतं. मुठींत मावणाऱ्या सफरचंदाच्या बीपासून, असेंच प्रयोग करून पपई–पपनीसाइतकं मोठं सफरचंद तयार केल्याचं उदाहरण आहे. आपण बटाटी खातों. तीं अगदीं रानटीं होती तेव्हां कडवट नि अगदीं अमदाबादी बोरांएवढी होतीं. तुम्ही तीं खाल्लीं सुद्धां नसतीं ! पण आतां हवीं तेवढीं मोठीं नि चविक बटाटीं पहायला मिळतील. तीं असे प्रयोग करूनच झालीं. बिनबियांचीं अंगूरद्राक्षं, बिनबियाचीं नारिंगं, बिया मुळींच नसलेलीं केळीं, अननसं...हजारों प्रकार तयार केले आहेत माणसानें ! चारपांच रंगाच्या पाकळ्या असलेलीं फुलं, मोठमोठ्या दाण्याच्या वाटाण्याच्या किंवा वालाच्या शेंगा–किती म्हणून प्रयोगानें तयार केलेल्या गोष्टी आहेत ? तुमची अक्कल गुंग होईल अगदीं !"



## १६—कृत्रिम निवड.

"हेंऽहो कसं होतं, मामाऽ ?" दोघांनाही या माहितीचं मोठं आश्चर्यच वाटत होतं; म्हणून त्यांनीं एकदमच विचारलं.

"अरेऽ, याला म्हणतात '**कृत्रिम निवड**'" मामा म्हणाले, "**आपोआप रानटी वाढ होते, ती ओबडधोबड होईल ! पण मुद्दाम निवड करून वाढ केलेली असेल, ती पाहिजे तशीच होईल.** प्राण्यांवर सुद्धां असे प्रयोग केले गेले आहेत ! म्हणजे पहाऽ,... रानटी गायी आपल्या वासराला फार तर महिनाभर दूध देतील. पण आपल्या गोठ्यांतल्या गायी वर्षं वर्षं दूध देऊं शकतात. कारण, हजारों वर्षं माणसानें त्यांच्यावर हे प्रयोग केले आहेत आपल्यासाठीं ! चांगल्या जास्त दुभत्या गायी निवडल्या; त्यांचीच वाढ केली. खूप लांब लोकर देणारे मेंढे असेच प्रयोगानें निर्माण झाले. फक्त खायचींच अंडीं बाराहि महिने पुरवणाऱ्या कोंबड्या झाल्या आहेत, त्या सुद्धां असल्याच प्रयोगानें !"

"खरंऽच ! गंमतच आहे हंऽ मोठी !" रवी-दिनू आनंदून म्हणाले.

"**आणि मनुष्य जितका जितका सुधारेल, शास्त्रांत जितका अधिक वाकबगार होईल, पुढें जाईल, तितकी तितकी ही गंमत वर्षानुवर्षं वाढत जाईल !**" मामा त्यांचं कुतूहल वाढवून म्हणाले– "पण त्याला एक दोन वर्षं पुरणार नाहींत !—पुढील शेकडों...हजारों वर्षं चुसत्या प्रयोगांनाच पाहिजेत."

## १७—आजही दिसणाऱ्या गोष्टींचा आधार.

रवी इतका वेळ विचार करत गप्प होता. त्याला एकदम मध्येंच तोंड फुटलं– "तें पुढलं सगळं कबूऽल, मामा !– पण ह्या आपल्या पाळीव प्राण्यांचे आजोबे–पणजोबे–खापरपणजोबे जंगली रानटी होते, हें आतां कांहीं आपल्याला दिसत नाहीं !–पटत नाहीं !–आपल्या तांबू गायीला रानटी कोण

म्हणेल ?– आपला मोत्या कुत्रा लहान मुलांशींसुद्धां किती जपून खेळतो !– त्याला पण रानटी म्हणायचं ? आणि मनी मांजरी आपल्या पिलांना चाटते, तशीच आम्हांलाहि चाटते. तिचीं नखं आम्हाला कधींच लावत नाहीं ती !– तिलाहि रानटी–"

"छानऽच विचार करतो आहेस रेऽ तूं, रवीऽ! अगदीं योग्य प्रकारें तुझी विचारांची गाडी पुढं चालली आहे बरं कां ?– हेंच बघ हं, आतां." मामा पुढें म्हणाले– "पडलीं कीं नाहींत तुम्हांला कोडीं ? एवढ्याचसाठीं तर मी तुम्हाला सारं नीट पहायला सांगितलं ! **तसं पाहिलंत, कीं, तुम्हाला अशीं वारंवारच कोडीं पडतील. आणि त्या कोड्यांचीं उत्तरं शोधालींत कीं या सगळ्या गोष्टींचाहि आपोआप उलगडा होईल."**

## १८—उभ्यानें मरण !

"म्हणजे हो कसाऽ, मामा ?" दिनूनें कुतूहलानें विचारलं.

"तुला एकच गमतीचं उदाहरण सांगतों !" मामा एकदम नवीनच आठवल्यासारखं करून म्हणाले– "मुंबईच्या राणीच्या बागेंत किंवा सर्कशींत तुम्ही हत्ती पाहिला असेल ! निदान चित्रांत तरी पाहिला असेल नक्कीच ! कधीं बसलेला हत्ती किंवा त्याचं चित्र पाहिलं आहे कारेऽतुम्हीऽ? शक्यच नाहीं सांपडणं तुम्हाला !"

"म्हणजेऽ ?– " दोघेही आश्चर्यानें एकदम म्हणाले.

"अरेऽ त्याचं असं आहे,..हत्ती रानटी असो, नाहीं तर माणसाळलेला असो, तो बहुतेक कधीं बसतच नाहीं !–" मामा हंसून गौप्यस्फोट करीत म्हणाले. "ते झोपतात सुद्धां उभ्यानें ! एवढंच काय, अशी उदाहरणं आहेत, कीं, हत्ती मरतात सुद्धां उभे राहूनच."

"काऽय ? खरंऽच सांगतांऽ? " दिनू आश्चर्यानें ओरडला.

"अगदींऽखरं !–मेल्यानंतरसुद्धां उभे असलेले हत्ती लोकांनी पाहिले आहेत ! मी कांहीं कल्पित कथा सांगत नाहीं आहे !–अगदीं शास्त्रज्ञांनी



पाहून शोधून काढलेल्या गोष्टि आहेत या !" मामा त्यांना पटवण्यासाठीं हावभाव करून म्हणाले—

"पण हत्ती उभ्यानें मेला किंवा बसून मेला, म्हणून त्याचे पूर्वज रानटी होते, हें कसं आम्हाला पटावं ?–" रवीनें संशयानें पटकन् विचारलं.

"छान पकडलेस हं मला !–" मामा हंसून म्हणाले–"अरे, तेवढ्यानें तें पूर्ण सिद्ध होतं असं कुठं म्हणतोंय् मी ? पण रानटी हत्तीची वागण्याची सुद्धां अशीच रीत आहे. आणि ती माणसाळल्यानंतर सुद्धां त्यांच्यांत जणूं कजून रहाते. हेंच काय तें मला सांगायचंय् !–पण तसं कशाला ?– धनगरी कुत्रे असतात, ते मेंढ्या हाकण्यांत धनगराला मदत करतात. पण एखादा नेहमीचा माणसाळलेला कुत्राच एकदम एखाद्या मेंढीवर झडप घालतो; नि तिच्या गळ्याला दात मारून तिला ठार मारतो. त्यावेळीं त्याच्या अंगांतला त्याचा पूर्वज जो लांडगा तो जागा होतो.–**अशीं पाळीव माणसाळलेल्या–प्राण्यांच्या वागणूकींतलीं उदाहरणं शोधलींत, तर त्यांचं त्यांच्या पूर्वजांशीं रक्ताचं नातं नक्कीच जोडतां येईल !–"**

मामांनीं दोघांकडे एकदां पाहिलं व ते पुन्हां पटकन् पुढं म्हणाले--"पण मी नाहीं आपणांहून सांगणार तुम्हाला असल्या गोष्टी. तुम्हांला अठ्ठेचाळीस तासांची अजून मुदत देतों. तेवढ्या वेळांत,...कुत्रीं, मांजरं, कोंबडी, बकरी, गायी यांच्या बाबतींतलीं तरी अशीं कोडीं शोधून काढा तुमचीं तुम्हींच;–मग मागाहून मी आणखी कांहीं गंमती सांगेन तुम्हाला पाहिजे तर–आतां झाली खूप रात्र ! झोंपूं या ! नाहींतर ताई रागवेल मला !"

"हो तरऽ.." रवी हंसून म्हणाला–"ती म्हणेल मामांनीं दोन माकडांच्या हातीं कोलीत दिलें...म्हणून !"

त्यावर तिघेही हंसले व अंगणातच झोंपी गेले.

## १९—छोटे संशोधक—

बरोबर अठ्ठेचाळीस तासांनीं पुन्हां चांदण्यांत अंगणांत बसून मामांजवळ दिनू-रवी गप्पा मारीत होते.

मामा म्हणाले-"तुमच्या बऱ्याच लटपटी चालल्या होत्या रेऽ दोन दिवस ! मी पहात होतों सारं ! हंऽ आतां तुम्हाला पडलेलीं कोडीं सांगा पाहूं मला, ठरल्याप्रमाणें !"

रवीनें कांहीं एक न बोलतां, आपल्या पायजम्यांतून एक कागदाची घडी बाहेर काढली; नि जवळचा कंदिल त्यानें पुढें ओढून, त्याची वात जरा मोठी केली.

"हेंऽ रेऽ काय ?-" मामा आश्चर्यानें कंदिलाच्या प्रकाशांत कागदाकडे पाहून म्हणाले.

"तें किनईऽ,..आम्ही दोघांनीं टिपण तयार केलं आहे !" दिनू जरा लाजत लाजत म्हणाला—

"हो, उगीच विसरायला नको कांहीं, म्हणून सुचतील तसे प्रश्न आम्ही दोघांनीं मिळून लिहूनच ठेवले आहेत, मामाऽ !-" रवीनेंही त्याला दुजोरा दिला झटकन्.

मामा कौतुकानें हंसले; तो कागद त्यांनीं उघडला, व ते वाचूं लागले—

१. कुत्र्यांच्या आम्ही तीन गंमती पाहिल्या. बहुतेक कुत्रे बसतांना आपल्या भोवतीं गरगर फिरतात नि मग बसतात, हें खरं आहे. पण कां ?

रात्रीं कोल्हे ओरडूं लागले, कीं, कुत्रे भुंकण्याऐवजीं मोठमोठ्यानें रडूंहि लागतात; हें आम्हांला दोन रात्रीं पहायला मिळालं. पण कां?

कुत्र्यांना खायला घातलं, कीं, ती भरभर वखवखां खातात, गुरगुरतात व एकमेकांवर तुटून पडतात. पण कां ?

कुत्र्यांच्या पुढल्या पायांवर एकेक बोट अधांतरीं लोंबकळत कां असतं ?



२. मांजराबद्दल आम्हाला खालील विशेष गोष्टी टिपून ठेवणं जरूर वाटलं—

मांजर अगदीं दबकत दबकत, कधीं सरपटत तर कधीं एकदम झेंप टाकून, मोठ्या खुबीनें झुरळाउंदरांची शिकार करतं. तें कधीं नखं रोवून झाडावर सरळ चढत जातं; तर कधीं वाटेल त्या वस्तूवर उगीचच झांप टाकतं; उडत्या माशीची शिकार करायचा मूर्खपणा देखील तें करतं. कां ?

मांजर अगदीं सावकाश खातं; कुत्र्यासारखं वखवखलेलं नसतं तें. कां ?

मांजरांची नखं कुत्र्यासारखीं नेहमी बाहेर नसतात. पाहिजे तेव्हां तीं आंत बाहेर होतात. त्याला लांब कल्ले असतात. पण कां ?

३. गाईम्हशींबद्दल...

"वाः ! भलेऽ...शाबास !" मामा मध्येंच वाचन थांबवून वर मान करीत दोघांना म्हणाले. "तुम्ही तर अगदीं एखाद्या संशोधकाचा आव आणून चार पांच पानं खरडलेलीं दिसताहेत रेऽ ! खरंच,...मला आवडली...तुमची ही टिपणाची कल्पना;...आणखी पुढं देखील लिहिलंय् कीं; पण तें मग बघूं वाटलं तर-आतां हे दोन प्राणी एका वर्गांत पडतात, तेव्हां त्यांच्याचबद्दलचीं कोडीं तेवढीं आपण प्रथम सोडवूं !—"

## २०—कुत्रीं-मांजरं.

"एक वर्गऽ ? म्हणजेऽ हो कसा ?" दिनूनें साशंकपणें विचारलं.

"म्हणजे मांसाहार करणाऱ्यांचा असा हा एक वर्ग !- " मामा स्पष्टीकरणासाठीं म्हणाले-"ही गंमत पहा आतां.:जंगलांत मांसाहार करणारे हे कुत्रा-मांजर असले प्राणी ! आतां माणसांचे निरुपद्रवी आज्ञाधारक सेवक झाले आहेत ते ! हरण-मेंढ्यावर झडप घालणारे कुत्रे ! पण आतां माणसांची मेंढीगुरं तेच काळजीपूर्वक पाळतात. माणसांवरही झडप घालणारी ती मांजरांची जात ! पण आतां फक्त उंदरा-घुशींची शिकार करून, माणसाचं

उलट संरक्षणच करते व माणसांच्या ताटाभोंवतीं निरुपद्रवीपणें व आशाळ-भूत दृष्टीनें पहात फिरते. आपण वाढूं तेवढंच खाते..."

"पण त्या दोघांतही थोडा फरक आहे, नाहीऽ मामा ?" रवी विचार करीत म्हणाला.

"कोणता रेऽ ?" दिनूनें प्रश्न केला.

"हीं मांजरं पक्कीं लबाड ! पण कुत्रे मात्र मोठे विश्वासू असतात !–" रवी पटकन् म्हणाला.

"होऽना ! खरंऽच तें ! आणि आपली आवडतीं माणसं जातील तिथं हीं कुत्रीं वाटेल तेवढीं लांब जातील. स्वार्थी मांजरं मात्र घराभोंवतीं नि चुली-शेजारीं सारख्या घिरट्या घालत रहातील वर्षानुवर्षं ! –" मामा हळूच पुढं म्हणाले—"पण त्याबद्दल मांजरांना कांहीं दोष नाहीं."

"असं कां बरंऽ म्हणतां, मामाऽ?" दिनूला मनांतल्या गोंधळामुळें प्रश्न पडला.

"अरेऽ, मांजर हें एकलकोंड्या पूर्वजांचं वंशज ! कुत्र्यांचे पूर्वज म्हणजे लांडगे; ते कळप करून रहाणारे. सगळ्यांनीं मिळून एक शिकार करायची नि तिचा एकदमच काय तो फडशा पाडायचा. कळपांतला जो बळी असेल त्याला अर्थातच जास्त हिस्सा मिळे. तेव्हां ते एकमेकांवर आतां सुद्धां खातांना गुरगुरणारच ! उलट, मांजरांचे पूर्वज एकट्या दुकट्यानें शिकार करीत; संथपणें चार दोन दिवस ती शिकार पुरवून पुरवून खात. तीच संथ खाण्याची त्यांना अजून संवय आहे. एकट्या दुकट्या प्राण्यानें म्हटल्यावर लपत छपत नाहींतर कशी रे शिकार करायची ? तेव्हां,...अजूनही तीच त्यांना संवय आहे. पण उलट लांडग्यांचे कळपच्या कळप शिकारीवर निर्भयपणें धांवून जाऊन तुटून पडत; म्हणून–कुत्रे अजूनही सरळ नि वेगानें धांवतात. मांजरं मात्र लपून छपूनच उंदीर पकडतात..."

"पण हें असं आतां शहरांत रहातांनाही अजून त्यांनी कां वागावं, मामा ?" दिनूनें मामांचे तें म्हणणं न पटून उलट प्रश्न टाकला.



"प्रश्न अगदीं सरळ वाटतोय्;..तुला तर तो अगदीं साधाही वाटतोय्..." मामा आपल्याशींच हसून म्हणाले... "पण आतां त्यांचं सरळ उत्तर देणं मला मात्र मोठं कठीण झालंय्..."

थोडा वेळ मामा विचार करायला थांबले. रवी-दिनू त्यांच्याकडे मुकाट्यानेंच पहात होते. जणूं त्यांना वाटत होतं 'आपण आतां हरवलं मामांना सपशेल !'

तेवढ्यांत, संथपणें सुरवात करीत मामा म्हणाले–"अशी गंमत आहे मुलांनो, कीं, जसा जसा प्राणी सुधारत गेला, तसतसा त्याच्या शरिराच्या रचनेंत, त्याच्या मनाच्या रचनेंतही फरक पडत गेला. त्याचे कांहीं अवयव हळूहळू निरुपयोगी ठरत गेले. पण नको असलेले,-जरूर नसलेले हे अवयव त्याच्या शरिरांत कायम राहिले. ते हळूहळू खुरटत मात्र गेले; तरी पण त्यांचे अवशेष राहिलेच. त्यांना आपण 'अवशेष अवयव' म्हणूं या !"

"काय ? अवशेष अवयव ?" रवी गोंधळून अडखळत म्हणाला–"ही काय बुवा भानगड ?"

"हो, अवशेष अवयव !" मामा त्याच ओघांत म्हणाले–"तीच गोष्ट मनाच्याही रचनेची—असं पहाऽ! प्रत्येक प्राण्याला निर-निराळ्या प्रकारची उपजत-बुद्धी असते. त्या निरनिराळ्या प्रकारच्या उपजत-बुद्धींत परिस्थितीनुरूप फरक पडतो. तरी पण त्या निरुपयोगी उपजत जाणीवेचे उरले-सुरलेले अवशेष त्या प्राण्यांच्या मनात मागें रहतातच ! ही अवशेष जाणीव –अवशेष-बुद्धी–देखील फारच प्रभावी असते. आणि त्यामुळेंच, माणसासकट सारे प्राणी आपल्याला असे चमत्कारिकपणें वागतांना दिसतात."

दिनू-रवी दोघेही अगदी कोऱ्या करकरीत निर्विकार चेहऱ्यानें मामांकडे पहात राहीले ! त्यामुळें खदखदां हसून मामा त्यांना म्हणाले, "पाहिलंत

नाऽ? केवढा सोपा प्रश्न नि केवढं कठीण उत्तर आहे तें ! तुम्हाला यांतील कांहीं एक समजलेलं दिसत नाहीं चेहऱ्यावरून तुमच्या !"

"अंऽ? तसं नाहीं काय-पण आतां गायी म्हशींचे 'अवशेष अवयव' का काय म्हणालांत तुम्ही, ते हो कोणते, मामा?" दिनूनें भीतभीतच अडखळून विचारलं.

"आणि आपल्या माणसांनाहि हे अवशेष अवयव आहेत ?" रवीनें गोंधळल्या चेहऱ्यानें प्रश्न केला.

"हं..!...आतां मात्र मला जरा हायसं वाटलं !" मामा पुन्हां हंसत म्हणाले. "निदान मी वापरलेले शद्ब तरी तुमच्या पूर्ण लक्षांत राहिले !"

"हो होऽअवशेष अवयव ! उपजत–बुद्धी" रवी–दिनू दोघे हसून पाठ केल्यासारखं म्हणाले.

## २१—निरुपयोगी भाग.

"**प्रत्येक प्राण्याला अवशेष अवयव आहेत.** मग गायी–म्हशींना...कुत्र्या-मांजरांना-माणसांनासुद्धां आहेतच कीं, ! आतां नीट लक्षांत घ्या"– मामा हळूहळू सांगूं लागले–"**एखादा प्राणी ज्या परिस्थितींत वाढतो त्या परिस्थितींतच तो जगला तर पाहिजे, त्याचं संरक्षणही झालं पाहिजे !— म्हणूनच निसर्ग त्याला जरूर ते अवयव पुरवतं ! पण कालान्तरानें त्याच्या भोंवतालची परिस्थिती बदलते. त्यामुळें आधीं उपलब्ध असलेले कांहीं अवयव त्यांच्या नव्या परिस्थितींत निरुपयोगी ठरतात. तो ते वापरत नाहीं. म्हणून मग या निरुपयोगी अवयवांची वाढ खुटते व ते हळूहळू नाहींसे होण्याच्या पंथाला लागतात. तरी पण मध्यें हजारों वर्षें त्या निरुपयोगी अवयवांचे त अवशेष, त्या प्राण्यांच्या शरि-रांत तसल्या खुरटल्या स्थितींत कां होईना, रहातातच ! यालाच**



**आपण 'अवशेष अवयव' म्हणूं या !** हे अवशेष अवयव, आपले शरिरांत असतात म्हणून असतात, एवढंच ! त्यांचा शरिराला तसा कांहींएक उपयोग नसतो !"

"मग मामाऽ असले माणसाचे अवशेष अवयव कोणते, तें सांगा पाहूं ?" रवी अधिरपणें म्हणाला.

"आणि इतर पाळीव प्राण्यांचे या कुत्र्या मांजरांचे अवशेष अवयव कोणते, तेंही सांगा मामा !" दिनूनें आपल्या कोड्याची सुधारून वाढवलेली नवी आवृत्ति तयार करून मामापुढें टाकली.

"अरे, थांबाऽ! थांबाऽ–" मामा पुन्हां खुदूखुदू हंसून म्हणाले, "एकदम अशी घाई करूं नका, बाबांनो !..नाहींतर तुम्हालाच समजणार नाहीं; नि मलाही तुम्हाला समजेल असं नीट सांगतां येणार नाहीं !"

क्षणभर तिघेही हंसत हंसत गप्प राहिले; मग मामाच आठवल्या-सारखं करून प्रश्न विचारूं लागले–"बरंऽ असं सांगाऽ.. तुम्हाला तुमचे कान हलवतां येतात का रेऽ?"

दोघांनीं हंसत हंसत आपले कान हलवण्याचा प्रयत्न केला. व शेवटीं हार जाऊन रवी म्हणाला—"आम्ही काय गाढव, बैल आहोंत ?"

"बरें, तर मग हे बघा हंऽ!—" मामांनीं आपले कान चटकन् हळूहळू हलवून दाखवले; ते दोघेही मोठ्यानें हसूं लागले; तोंच मामाही हसून म्हणाले, "आतां मीऽ रे कोऽण ? गाऽढव कीं बैल ?"

पुन्हां रवी–दिनू मोठ्यानें हसूं लागले. रवी म्हणाला, "तसं नाहीं कांहीं आमचं म्हणणं...पण...

"बरं ! तेंऽ राहूं द्या, म्हणा !" विषय बदलून मामा म्हणाले..."पण तुम्हाला कोणाला तुमची शेंपटी तरी हलवतां येईल कां ?"

"शेंपटी ? आम्हाला शेंपट्याच नाहींत तर आम्ही हलवणार कशा त्या !–" दिनू खो खो हसून म्हणाला,

"पण कोण म्हणतं तुम्हाला शेंपट्या नाहींत ?" मामांनीं जरा लटकंच आश्चर्य व्यक्त करून म्हटलं. "पाठीच्या मणक्याच्या अगदी खालच्या टोंकाला तुम्हाला शेपटीचं अगदीं छोटं हाड आहे. तुम्ही जन्मण्यापूर्वी एकदां तुम्हाला लहानसं कां होईना शेपूटही होतं ! तें हलवायला तिथें स्नायूही होते. पण आमच्या शेपटीचं आतां फक्त अगदीं सूक्ष्म हड्डूक तेवढं तुमच्या हाताला लागेल."

रवी–दिनूनी हळूच आपली शेपटी चांचपून पाहिली व ते हसत सुटले.

"हे कानाचे स्नायू. बोटाच्या पेराएवढी शेपटी व तिचे स्नायू, आपल्या अक्कलदाढा, आपल्या अंगावरचे केस, हे सारे माणसाचे अवशेष अवयवच होत !" ते दोघे हंसत असतानांच, मामांनी स्पष्टीकरण केलं; "आपल्या पोटांतही भयंकर घातक असा एक अवयव आहे. त्याला म्हणतात 'अपेंडिक्स' —पोटांत भयंकर दुखूं लागतं; नि दोन तीन दिवसांत माणसें 'ॲपेंडिसायटिस' म्हणून रोग होऊन मरतात. तसल्या मृत्यूला हा एक आपला अवशेष अवयवच कारण होतो."

"असं ! तो असतो कुठं ?" रवीनें डोळे विस्फारून विचारलं.

"नि तुम्ही तर म्हणतां कीं अवशेष अवयव कामच करीत नाहींत, तर मग माणसं कां हो मरतात ?" दिनूनेंही आश्चर्यानें प्रश्न केला.

"अगदीं रास्त प्रश्न आहे तुझा !" मामा उलगडा करीत म्हणाले; "अरेऽअसं बघाऽ ! ॲपेंडिक्स हा आपल्या पचनेंद्रियांमधलाच एक भाग असतो. तो साफ कापून टाकला तरी माणसाला कांहीं अपाय होणार नाहीं. आणि ॲपेंडिसायटीस्चं ऑपरेशन करतात, म्हणजे त्यावेळीं तो सडलेला भागच कापून टाकतात ! उंदराच्या पोटांतला हा भाग पाहिलास तर मोठा असतो व त्याला त्याचा दुसऱ्या अन्नाशयासारखा उपयोग होतो. माकडाच्या पोटांत तो थोडासा उपयोगी असतो; म्हणून तो मध्यम आकाराचा असतो. पण माणसाला त्याचा कांहींएक उपयोग नसतो. त्यामुळें तो अगदीं एखाद्या छोट्या पालीच्या शेपटीसारखा बारीक झालेला आहे !"



"एवढ्याशा निरुपयोगी अवयवानें माणसं अशीं मरतात कां पण ?" रवीला नवं कोडं पडलं.

"अरेऽ कधीं कधीं अगदीं चुकून जठरातलं अन्न त्यांत एकदम शिरतं !" मामांनी त्याची शंका दूर केली. "आणि मग तिथं ते सांचलं, कीं, तो भाग जळावतो. त्याला मोठा फोड होतो. व फाटोक्याबाहेर गेलं कीं तिथलं ते विष सार्‍याच इंद्रियांना मारक होतं. !"—

"हंऽ हंऽ—म्हणजे पूर्वी उपयोगी व आतां अगदी निरुपयोगी असलेल्या या भागाचा आतां एक अगदी बारका अवशेष राहिला असंऽच ना ?" रवीनें विचारलं.

"हंऽ !" मामा म्हणाले. "अगदींऽ तस्संऽच !"

## २२—अवयवांची वाढ.

"असंऽबघा–असले अवशेष अवयव इतर अनेक प्राण्यांतही सांपडतील !–" मामा क्षणभरानें म्हणाले, "कुत्र्याच्या पायाची बोटं तुम्ही पाहिलीच आहेत म्हणतां ना ? त्यांच्या पुढल्या पायांच्या लोंबकळणाऱ्या बोटांचं तुम्हाला कोडं पडलं होतं, नाहीं कां ? मग ते त्यांचे निरुपयोगी अवशेष अवयवच म्हणायचे !"

"म्हणजेऽ हो कसं ?" रवीनें मध्येंच विचारिलं.

"अरेऽ पांच बोटांचे हात–पाय हा सार्‍याच स्तन्य प्राण्यांचा नियम; माणसाला, माकडांना पांच बोटं अजूनही आहेत. पण शेकडों वर्षांच्या बिनवापरामुळें कित्येक प्राण्यांची बोटं हळूंहळूं खुरटत गेलीं !"

"म्हणजेऽ सार्‍यांना पांच बोटं नसतात ?" दिनूनें कुतूहलानें विचारलं.

"हेऽ! आपल्याला पांची बोटं आहेत. हिप्पापाटेमस प्राण्याला चार चार बोटं सांपडतील. र्‍हैनॉसेरॉसला तीन तीन सांपडतील. गायीच्या पायांना

दोन दोनच बोटं सांपडतील. तर घोड्याच्या पायाला एकाच मोठ्या बोटाचा खूर असल्याचं तुम्हांला दिसेल !"

"हं हंऽ ! **म्हणजे या निरनिराळ्या प्राण्यांनीं आपल्याला सोयीचं वाटेल त्याचप्रमाणें आपली एकपासून चारपर्यंत बोटं टाकून दिलीं.**" रवीनें जरा चांचरतच विधान केलं.

"हो ! असंच असणार !" दिनू मामांकडे आधाराला पहात म्हणाला, "आणि पाहिजे त्या बोटाची हवी तशी आकारांत वाढ करून घेतली ! होऽ ना, मामाऽ ?"

"अगदीं बरोबर समजलं तुम्हांला !" मामा त्यांना उत्तेजन देत म्हणाले. "तरी पण, आणखी एक गंमत लक्षांत घेतली पाहिजे इथं तुम्हाला !"

"कसलीऽ ?" दोघेही एकदम चमकून म्हणाले.

"हीं निरुपयोगी नि टाकून दिलेलीं म्हणतां, तीं त्यांचीं साऱ्यांचीच बोटं साफ नाहींशीं झालेली नाहींत !" मामा उलगडा करूं लागले. "कांहीं असेच अवशेष अवयव म्हणून-अगदीं लहानशीं नि लोंबकळतांना दिसतातच आपल्याला !—कुत्र्याचं लोंबकळणारं छोटं बोट यांतलंच. गाय दोन मोठीं बोटं वापरते; पण दोन लोंबकळणारीं खुरटलेलीं छोटीं बोटं तिच्या पायाला वर चिकटलेलीं अजूनही दिसतात ! **या अवशेष अवयवांवरूनच त्यांचा मागला इतिहास आपल्याला समजूं शकतो.**"

## २३—नैसर्गिक निवड.

"आणि मघाशीं तुम्ही म्हणालांत, कीं, कांहीं कांहीं अवयव प्राणी पाहिजे तसे बदलूनही घेतात ! म्हणजेऽ हो कसंऽ, मामा ?" रवीनें क्षणभरानें नवी उत्सुकता दाखविली.

"ती पण एक गंमतच आहे मोठी !" मामाही रवीचं कुतूहल पाहून उत्साहानें म्हणाले, "असं बघ ! सरडे आणि साप; दोघे भाऊबंदच ! पण त्यांच्यातला फरक केवढा मोठा पहा. सरड्यांना पाय असतात. उलट, साप सरपटत जातो; कारण, त्याचे पाय निरुपयोगी म्हणून त्यानें ते आपल्या शरिरांतून साफ काढून टाकले. पक्ष्यांना दोन पाय नि दोन पंख असतात. कारण, पुढच्या दोन पायांत त्यांनी आपल्याला पाहिजे तसा फरक करून घेतला नि त्यांचेच पंख तयार केले. बरं, मासे समुद्रांत फिरतात; त्यांना पंखांचीच फार जरुरी ! म्हणून त्यांनी आपल्या पुढच्या पायांना हजारों वर्षांच्या प्रयत्नानें तसा सोयीस्कर आकार मिळविला ! **हीच ती त्या त्या प्राण्यांनी परिस्थितीनुरूप केलेली आपल्या अवयवांची नैसर्गिक निवड !**"

"मग आतां गायी-बैलांना, त्यांच्या शिंगांचा काय उपयोग असतो हो ! मामाऽ!" दिनूनें प्रश्न टाकला. "ती कशाला आहेत अजून त्यांच्या डोक्यावर?"

"तसा कांहींच उपयोग नाहीं !" मामा त्याचा प्रश्न योग्य आहे असं पाहून म्हणाले, "पूर्वी एकदां जंगलांत, स्वसंरक्षणासाठीं ती त्यांची भाल्या-सारखीं हत्यारंच होतीं ! पण आतां खरं पहातां, जरुरी नाहीं त्यांची त्यांना; म्हणूनच तर कधीं कधीं माणसं गोठ्यांतल्या पाळीव गुरांचीं शिंगं कापून टाकतात. प्रयोग करून करून, बिनशिंगाच्या मेंढ्या वगैरे प्राणीही माणसानें तयार केले आहेत कीं !"

"असंऽ ?" दिनूला मोठंच आश्चर्य वाटलं.

"होऽना !....उलट, कांहीं अवयव वाढतही जातात ! आतां बघ... उत्तर ध्रुवाकडे एक व्हेल माशाचीच जात आहे. त्याच्या दोन दातांपैकीं एक-च दात आठ आठ फूट पुढं तोंडासमोर वाढत गेलेला आढळतो. अर्थात् त्याचा उपयोग बर्फाला भोकं पाडायला अगर शत्रूंवर भाल्यासारखा मारा करायला तो प्राणी करतो. दुसऱ्या एका 'केव्हफिश' म्हणून माशाला डोळे असतात, पण त्याला दिसत मात्र नाहीं. आणि आपणा माणसांच्या दोन पापण्या तुम्हाला दिसल्या तरी तिसऱ्या एका पापणीचा नुसता निरुपयोगी अवशेष

अजूनही तिथं आहे. पक्षी, कासव वगैरे कांहीं प्राणी मात्र या तिसऱ्या पापणीचा उपयोगही करतात अजून. "

" **म्हणजे कांहीं प्राण्यांमध्यें निरुपेयागी... नि म्हणूनच, खुरटलेले अवशेष अवयव दुसऱ्या कांहीं प्राण्यामध्यें अजूनही पूर्ण वाढ झालेले, उपयोगी व चांगले काम काम करणारे आढळतात !** असंऽच्च नाऽ ?" दिनूनें गोळाबेरीज शोधून काढली.

" होय होय, असंऽच !" मामा त्याला म्हणाले.

## २४—उपजत-बुद्धि

" आणि अवशेष उपजत-बुद्धि कीं काय म्हणालांत मघांशीं तुम्हीं;.. त्याचा अर्थ काय ? " रवीनें पटकन् नवा प्रश्न टाकला.

" **अरेऽ, शरिरांतील निरुपयोगी इंद्रियांचा जसा अवशेष मागें राहिल्याचं आपण आतां पाहिलं, तसंच एखाद्या प्राण्याला आतां निरुपयोगी असलेल्या मनांतल्या जाणीवेचे-उपजत-बुद्धीचे-अवशेष राहतात !** तें एकदां समजलं, कीं, हेंही समजायला वेळ नाहीं लागणार तुम्हांला ! " मामा उत्तेजन देत म्हणाले.

" पण आधीं ही उपजत-बुद्धी ती कसली ? " दिनूनें गोंधळून विचारलं. " मला नाहींऽबुवा नीट समजलं ! "

" अगदीं सहऽज समजेल बघ तुला, जरा नीट लक्ष दिलंस तर ! " मामा त्याला म्हणाले. "ज्या परिस्थितींत प्राणी वाढतो त्या परिस्थितील अनुरुप असे याच्या शरिराला अवयव प्राप्त झालेले असतात; हो ना? तेवढ्यावरच त्यांचं सारं काम भागणार नाहीं. म्हणून **त्या त्या परिस्थितींत वागणाऱ्या त्या त्या प्राण्याची मनोरचनाही हळूहळू तिला अनुरूप अशीच होत जाते.** "

" म्हणजेऽहो कशी ? " रवीनें पूर्ण न समजल्यामुळें प्रश्न टाकला.



" नाहींऽ समजलंऽ? बऽरं ..तर मग, आतां पहा, हंऽ!" मामा जरा अधिक सुलभपणें समजावं म्हणून सोपे सोपे शद्ब व सोपीं सोपीं उदाहरणं सांगूं लागले—" तुझ्या तांबू गाईला वासरूं झालं. तिच्याचसारखे चार पाय तीन बोटांचे खूर, लांब शेंपटी, हलणारे कान, रवंथ करण्याची शक्ति !—हे सारे त्या वासराला जन्मतांच लाभतं कीं नाहीं ? आतांपर्यंतच्या अनुभवामुळें व आपण विचार केला त्याचाही आधार घेऊन, त्यांत तुम्हाला आश्चर्य वाटणार नाहीं ! कबूऽल ? "

" होऽ अगदीं सहाजिकच आहे तें." रवी हंसून म्हणाला-"नि आम्हांला हलणारे कान नाहींत, शेपटं नाहींत, हेंही तितकंच साहाजिक आहे."

" स्वतःला शेंपटी नसण्यावर तुझा बराच कटाक्ष दिसतोय् रेऽ रवी !" मामा हंसून म्हणाले. " बरं तें असो. तुम्हाला **ही शरिराची रचना जशी साहाजिक वाटते तशीच त्या त्या प्राण्याच्या मनाचीही एक साहजिक रचना असते.** हें पटतंय् कीं नाहीं, तुम्हाला ?"

## २५—उपजत-बुद्धीचं स्वरूप.

मध्यें थोडा वेळ झालेली शांतता मोडून दिनूनें हळूच विचारलं, " तर मग,..गाईच्या मनाची साहाजिक रचना कोणती, मामा ? "

" अरेऽ, गाईच्याच मनाची कशाला ?—सर्वच जिवंत प्राण्यांच्या मनाची साहजिक रचना सामान्यतः एक सारखीच असते..." मामा त्याला समजावीत म्हणाले " असं पहा—भूक लागली, कीं अन्नासाठीं सर्वच प्राण्यांचा जीव व्याकुळ होतो. तसाच गायीचाही होणार !—भक्ष्य जवळ नसलं, कीं, त्याचा शोध करत फिरणं, तें हस्तगत करण्याची धडपड करणं, ही सर्वच प्राण्यांची उपजत बुद्धी आहे. गाय, कुत्रा, मांजर, मनुष्य, अगदीं कोणीहि या नियमाला अपवाद नाहीं ! "

रवि-दिनू एकाग्रतेनें ऐकत होते. तें पाहून मामा पुढें म्हणाले—" चारी बाजूला फिरत असतां, जीवाला धोका आला, कीं, प्रथम भयंकर घाबरणं;

समोर दिसणारा शत्रू आपल्याहून बलवान असला तर जीव घेऊन पळून जाणं; पण उलट आपल्याहून नवळा अशक्त असला, तर धीरानें त्याच्या-वर झडप घालून चाल करणं; त्याला शक्य तों जमीनीवर लोळवून ठार करणं व आपला मार्ग निष्कंटक करणं; ही देखील सर्व प्राण्यांची उपजत-बुद्धिच ! वाघ-सिंहासारखे धैर्यानें दुसऱ्यांवर झडप घालणारे हिंस्त्र पशु काय किंवा गाय, हरीण, यांसारखे प्रत्यक्ष निरुपद्रवी प्राणी काय, असल्या परिस्थितींत अगदीं असंच वागणार !"

"आणि असं त्यांना कांहीं कांहीं बाबतींत आपणहून वाटणं हीच त्यांची उपजत-बुद्धी!" रवीनें मध्येंच म्हटलं.

"हो!" मामा म्हणाले, "आणखी आपली जात वाढावी, समृद्ध व्हावी, बलवान व्हावी, या हेतूनें आपल्या पिल्लांना जन्म देणं, तीं दुबाळीं परावलंबी असेपर्यंत त्यांचं डोळ्यांत तेल घालून संरक्षण करणं, ही देखील प्रत्येक प्राणिमात्राच्या मनाची साहजिक नैसर्गिक रचनाच आहे. त्याला पाळीव प्राणी, हिंस्त्र प्राणी किंवा त्या साऱ्यांवर हुकमत नि राज्य चालवणारा मनुष्य प्राणी यापैकीं कोणीच अपवाद नाहीं."

## २६—उपजतबुद्धीचा उपयोग.

"पण या असल्या जन्मजात उपजतबुद्धीचा उपयोग काय बुवा प्राण्यांना?" रवी गोंधळून म्हणाला. "त्या त्यावेळीं त्यांना तो तो विचार नाहीं सुचणार?"

"वाः ऽउपयोग असतो तर?–फार उपयोग असतो!" मामा त्याला हंसत हंसत म्हणाले–"प्रत्येक प्राण्याला, त्या त्या जरुरीच्या वेळीं, ती ती जोरदार इच्छा—तिला आपण प्रेरणा म्हणूं या–जर झाली नाहीं, तर त्याचे व्यवहार तरी चालणार रेऽ कसे?...प्रत्येक वेळीं प्रत्येक गोष्टीचा अगदीं विचार करून मगच त्याप्रमाणें वागणं, हें त्याला शक्य नाहीं, नि हितावहही नाहीं. तेवढ्यासाठीं पुष्कळच वेळ फुकट



जाईल; नि तसल्या विचार करण्यामुळें होणाऱ्या विलंबानें तर त्याचा नाशही होईल कदाचित्! म्हणूनच, नेहमीं नेहमीं एकच गोष्ट हजारों वर्षे करत राहिल्यावर त्या प्राण्याची त्या त्या परिस्थितींत वागतांना करावयाच्या त्या त्या हालचालींबाबत एक ठराविक मनोरचना बनत जाते. ती मनोरचना त्या त्या प्राणाच्या पिलांनाहीं अगदीं जन्मतःच येते. या प्रेरणेला (जाणीवेला, ठराविक वागणुकीलाच) आपण उपजत-बुद्धि म्हणायचं!"

## २७—एका प्रसंगींची हालचाल.

दिनू भांबावल्यासारखा मामांकडे टकमक पहात होता. त्याच्याकडे पाहून हंसत मामा म्हणाले—"तुला समजलं नाहीं ना?—बऽरं...आतां बघ हंऽ-समज, तूं मुंबईच्या रस्त्यांतून जात आहेस; पुढून-मागून मोटारी आल्या... एका बाजूनें ट्राम जोरांत चाललेली असली; तर तुला काय वाटेल?–तुझी त्यावेळीं काय हालचाल होईल रेऽ?–"

"मी एकदम घाबरेन...नि टुणकन् फुटपाथवर उडी मारून स्वतःला त्या अपघातातून बचावण्याचा प्रयत्न करीन!" दिनू उत्साहानें हावभाव करीतच म्हणाला.

"शाबाऽस!– याक्षणीं बोलतांनासुद्धां तूं अगदीं त्याच आवेशांत बोलतो आहेस!" मामा हंसत म्हणाले,– "पण तें साहजिकच आहे. तिथं कसला विचार नसतो...तुझी उपजत-बुद्धिच त्यावेळीं काम करते सगळं!"

"कांहींतरीऽच सांगतांहां!... आमची आपली कशीतरी समजूत करतांहां, झालंऽ!" रवी एकदम मध्येंच म्हणाला.

"वेडाऽच आहेस!–अरेऽ हें अगदींऽ खरं खरं आहे!" मामा हंसले व पुढं म्हणाले–"असंऽ बघ, प्रत्येक प्राण्याला आपण जगावंसं वाटतं!–संकटांतून वाचावंसं वाटतं—आल्या संकटाची भयंकर भीतीही वाटते;–त्यावेळीं अंगावर शहारे उभे राहतात. अंगात हुडहुडी भरते; आणि हा हजारों-अगदीं

लाखों वर्षांचा मनावरचा परिणाम असल्यामुळें, अशा वेळीं तो प्राणी विचार करीत बसत नाहीं. त्याच्या मनाची व त्यामुळेंच त्याच्या साऱ्या शरिराचीही, त्याला नकळतच, ठराविक हालचाल होऊन जाते व तो संकटातून वांचतो !"

"म्हणजे दिनूच्या बाबतींत काय झालं?...मला नाहींऽ बा कांहीं समजलं !" रवीनें कुरकुर करीत पुढं म्हटलं-"गडबडगुंडाच आहे जरा हाऽ-"

"आतां बऽघ !-दिनू मघां म्हणाला, तशी तो पटकन् फुटपाथवर उडी मारणार, हें खरं. पण उडी मारतांना मात्र त्याला समजणारसुद्धां नाहीं, कीं आपण उडी मारली म्हणून. आणि अगदीं चुकून नकळत सुद्धां, मोटर-खालीं किंवा ट्रामखालीं तो कधीं उडी नाहीं मारणार-फुटपाथवरच उडी मारेल !-"

"पण यांत उपजत-बुद्धीचा काय संबंध ?-"रवीनें धीर न सोडतां आज अगदीं मामांचा पिच्छाच पुरवायचं ठरवलं होतं.

"अरेऽ, त्याच्या उपजत-बुद्धीमुळेंच त्याला ही भीती वाटली." मामा हंसून म्हणाले, "उपजत-बुद्धीमुळेंच त्यानें अगदीं नकळत तत्काळ संकटा-पासून लांब उडी मारण्याचं ठरवलं ! नि त्या उपजत बुद्धीच्या प्रेरणेनेंच (त्याला अगदीं नकळत), त्याच्या शरिरानें एकदम सारं यंत्रा-सारखं काम केलं ! त्याची त्या संकटातून सोडवणूक केली. समजलंऽ आतां ?"

"एवढ्याऽ लहानशा गोष्टींत एवढाऽ मोठा अर्थ असतोऽ भरलेला ?"-दिनूला थोडं पटलंच; तरी पण त्याबद्दल त्यानें आश्चर्य व्यक्त केलं.

## २८—हजारों वर्षांची वागणूक.

"पण मामाऽ, ट्राम-मोटारी-फुटपाथ या तर अगदीं अलिकडच्या गोष्टी ! त्यांच्यापासून बचावण्याची ही बुद्धी दिनूला उपजत हो कशी असेल ?



माणसाच्या मनांत ती तयार व्हायला लागतात म्हणतां तीं हजारों वर्षं कुठं गेलीं आहेत, ट्राम-मोटारींना?-" रवीनें पुन्हां प्रांजल शंका पुढं मांडली.

"हं! तुझा हा प्रश्न अगदींऽ बरोबर आहे. पण तूं अर्धवटच विचार केलास! आणि म्हणूनच तुला असली वेडी शंका आली." मामा हंसून म्हणाले. "ही उपजत बुद्धीची प्रेरणा ट्राम-मोटारींपासून बचावण्याची नव्हती. फक्त संकटाची भीती उत्पन्न होऊन त्या संकटापासून बचावण्याची होती. हजारों वर्षांपूर्वी त्याला घोडा-गाय यांची अशीच भीती वाटली होती. मनुष्यांभोंवतीं अरण्य पसरलं होतं, तेव्हां...वाघ, सिंह वगैरे हिंस्र प्राणी किंवा अजस्त्र हत्ती, रानडुकर, अजगर, साप, यांचीही त्याला अशीच भीती वाटली होती. यांत-'एक संकट' —'त्याची भीती' व 'त्या संकटांतून स्वःची सोडवणूक'—हाच एक सर्व-सामान्य प्रश्न होता. आणि त्याचा सारखा सारखा परिणाम होऊनच त्याची तशी मनोरचना झाली. तिचा उपयोग करतांना आणखी फुटपाथवरून चालण्याच्या सुरक्षित संवयीचा त्याला नळकत उपयोग झाला ! उपजत-बुद्धि,...संवय, याच साऱ्या गोष्टींचा-मुंबईसारख्या शहरांतून जातांना अशा वेळीं दिनूला रस्त्यांत उपयोग झाला. आणि स्वतःला बचावण्यासाठीं त्यानें तो उपजत-बुद्धीचा उपयोग अगदीं स्वतःला नकळतच केला !"

"हंऽ! हंऽ! आतांऽ मला समजलं-" रवी जरा आनंदून म्हणाला—"**निरनिराळया वेळीं, निरनिराळया परिस्थितींत, वरवर निर-निराळ्या वेळीं वाटणाऱ्या (पण मुख्यतः ठराविक) पद्धतीनेंच आपोआप वागण्याची प्रत्येक प्राण्याच्या मनाची जी रचना असते, तिलाच उपजत-बुद्धी म्हणतात !** असंऽच ना ?"

"होऽ ! अगदींऽ बरोबर ! असंऽच !" मामा खूष होऊन म्हणाले.

## २९—जन्मजात जाणीव

"मग मामा, अगदीं लहान मूल किंवा तांबू गायीचं चिमुकलं वासरूं देखील त्या त्यावेळीं तसंऽच वागेल म्हणतांऽ?-" दिनूनें जरा विचारी

चेहरा करून म्हटलं–" कां तें मोठं होत जाईल, वाढत जाईल, तसतसं त्याला तें समजत जाईल ? "

" वेडा रेऽवेडाऽ ! असं असतं तर मग त्याला उपजत-बुद्धी कशाला म्हणायचं ?– " मामा स्मित करून म्हणाले, " **ज्या गोष्टींची प्राण्याच्या मनांतली जाणीव अगदीं उपजतच, अगदीं जन्मवेळींच, त्याच्या मनांतच तयार असते,...तिलाच तर त्याची उपजत-बुद्धी म्हणायचं !– आतां साऱ्याच उपजत-बुद्धीची प्रत्यक्ष जाणीव त्याला जन्मतःच असल्याचं आपल्याला दिसत नाहीं.** त्या त्या परिस्थितींत तो प्राणी पडला कीं मग मात्र ती अचानक जागृत झाल्याचं आपल्याला आढळत, एवढंऽच ! "

" म्हणजेऽ? हें आणखी काय निराळं ?– हें नाहीं बुवा समजलं आपल्याला ? " रवी आंबट चेहरा करून म्हणाला—

" म्हणजे असंऽ बघ ! " मामा उदाहरण आठवत सांगूं लागले— " बाळ जन्माला आलं, कीं, आपल्याला भूक लागली आहे, हें त्याला कळतं, उपजत-बुद्धीमुळें; आंतून प्रेरणा होऊन, ते मोठमोठ्यानें रडूं लागतं. दूध मिळतांच या भुकेच्या वेळीं कसं वागायचं या आपल्या उपजतबुद्धीची जाणीव त्याला जन्मतःच झाली. पण भीतीची उपजतबुद्धी व आपल्या संरक्षणाची उपजतबुद्धी यांची जाणीव त्याला त्यावेळीं नसते, असं आपल्याला फक्त वाटतं. कारण, तसली प्रत्यक्ष परिस्थितीच त्याच्यावर कोणीं येऊं देत नाहीं,...म्हणून ! "

" पण मग हें समजायचं पटायचं कसं आपल्याला ?" दिनूनें विचारलं·

मामा क्षणभर थांबून म्हणाले, " आतां कल्पना कर हं, एखादं लहान मूल दोरीनें घट्ट बांधलं नि दुसऱ्या मजल्यावरून त्याला मध्येंच हवेंत लोंबकळत ठेवलं...थोडा वेळ; तर त्याला आपलं नक्की संकट जरी नीट समजलं नाहीं, तरी कांहींतरी निराळं...भयंकर आहे, याची त्याला जाणीव खात्रीनें होईल. आणि संकटाच्या वेळीं भयभीत होण्याची त्यांची उपजतबुद्धी



त्याक्षणीं लागलीच जागृत होईल. तें मोठ्यानें दचकेल; मोठ्यानें रडेल; हातपाय जोरजारानें हलवूं लागेल— "

## ३•—' हें होऽ काय ? '

तेवढ्यांत, मामा पटकन् उठले व त्यांनीं जवळून जात असलेला एक बागुर्डा उचलून रवीच्या अंगावर सोडला; त्याबरोबर तो एकदम मोठ्यानें ओरडला व त्यानें तें झुरळ अंगावरून लांब झटकलं.

मामा खूप मोठ्यानें हंसूं लागले. दिनूहि खो खो हंसत होता.

अखेर तें झुरळ लांब निघून गेलेलं पाहून, रवीही थोडा भानावर आला नि लाजत लाजत म्हणाला–" हें ऽ हो काय, मामाऽ ?"

"अरेऽ हीच ती उपजत-बुद्धी,–उपजत भीती !" मामा हंसतच त्याला म्हणाले–"म्हणूनच तूं आधी मोठ्यानें ओरडलास. नि झुरळ तुला चावणार नाहीं, खाणार नाहीं हा विचार तुझ्या मनांत आतां मागून आला ! खरंऽ कीं नाहींऽ ? म्हणूनच तूं याक्षणीं लाजतो आहेस. असली ही **उपजत-बुद्धीची यांत्रिक योजना सर्वच प्राणांच्या मनांत निसर्गानें एकदां कायमची तयार करून ठेवली आहे. तिचा एकेकाळीं प्राण्याला फार उपयोग होता. आतां प्रत्येकाचा तितका उपयोग नेहमींच राहिलेला नाहीं; तरी पण त्या उपजत-बुद्धीचे अवशेष मात्र अजूनहि अवशेष अवयवांसारखेच मनांत राहिलेले आहेत ! तेच असे पुष्कळदां प्रगट होतात !**...तुझी अवशेष उपजत-बुद्धी–उपजत भीती नुकतीच नाहीं का आपण सर्वांनीं पाहिली ?...झालं तर !..."

"म्हणजे हीच तुम्ही मघां म्हणालांत ती अवशेष उपजत-बुद्धी वाटतं ?" दिनूनें हलवून खुंटी बळकट करण्यांसाठीं मामांना प्रश्न केला.

" पण शरीररचनेंत नवीन नवीन परिस्थितीमुळें फरक पडत गेला, तसा या मनोरचनेंतहि–या उपजत-बुद्धींतहि—पडेल का होऽ, मामा ?" रवीनें संशयित चेहऱ्यानें विचारलं.

" तुम्ही अगदीं मनापासूनच लक्ष देतांहां बरं का!-नि मनाशीं चांगलाच विचार करतां आहां! मी तुम्हाला हें सांगतोंय् याचं अगदीं सार्थक झाल्यासारखंच याक्षणीं वाटतंय् मला!" मामांनीं आनंदून दोघांचं कौतुक केलं.

" पण ही माहितीच मुळीं तशी मोठी गंमतीची आहे, मामाऽ!"-दिनू मूठभर मांस चढल्याप्रमाणें उत्तेजित चेहरा करून म्हणाला.

" अरेऽ नीट लक्ष घालणाऱ्यालाच हें सारं मनोरंजक!" मामा लागलीच म्हणाले—" आळशी मुलं इथं हें ऐकायला असतीं, तर एवढ्यांत जांभया देऊन, तीं पेंगू देखील लागलीं असतीं! क्षणभरानें घोरूंहि लागलीं असतीं!-"

## ३१—अनुभवांतले दाखले.

चार दिवसांपूर्वीच्या आपल्या आठवणींनीं दोघेहि हळूच हसले.

" पण मामाऽ, ही अवशेष उपजत-बुद्धी आपल्या पाळीव प्राण्यांत असते म्हणतां, तर ती आपल्याला दिसत कां नाहीं?" क्षणभरानें दिनूनें विचारलं.

"तुम्हीच पहात नाहीं नीट... म्हणून दिसत नाहीं! दुसरं काय?" मामा पटकन् म्हणाले–" अगदीं मिनिटामिनिटाला दिसेल आपल्याला ती!"

"आम्हाला नाहीं बाऽ अजून दिसली!" रवी अधिकच गोंधळून म्हणाला.

"अस्संऽ? ठीक!– काढ बघूं तुझं मघाचं टिपण?" मामा त्याला आव्हान देत म्हणाले, "तुम्ही पाहून-टिपून जें ठेवलं आहेत,...त्या माहितीतच ही निरनिराळ्या पाळीव प्राण्यांची अवशेष उपजत-बुद्धी सांपडेल! तुम्ही त्या तुमच्याच निरीक्षणाचा तितक्या खोल दृष्टीनें विचार केलेला नाहींत, म्हणूनच वाटतंय् तुम्हाला तसं!"

" खरंऽच!" दिनू व रवी दोघेही मामांजवळ अधिक सरकून बसत म्हणाले. कारण, मामा त्यांचीच मघाची टिपणवही पुन्हां चाळून पहात होते.



## ३२—उपजत-बुद्धीचा प्रताप.

" आतां हें पहा हं! कुत्रा, मांजर, गाय, कोंबडी, एवढ्यांचीच विशेष पहाणी केलेली दिसतेय् तुम्ही!" मामा वहींतून वर डोळे करून दोघांना म्हणाले, " तरीऽ हरकत नाही–हें पहा हं–तुम्हींच लिहिलंय् त्यांतलं हें लक्षांत घ्या–कुत्र्याचं बसतांनाचं गरगर फिरणं, हुंगत हुंगत इकडे तिकडे जाणं, त्याचं रडणं; किंवा मांजरांचं...नखं ओरबडून झाडावर सरळ चढत जाणं, दबकत दबकत भक्ष्यावर झडप घालणं; त्या जनावराचं संथ खाणं नि कुत्र्याचं मात्र वखवखां खाणं; किंवा मांजराचं घराभोंवतीं जीव गुंतवून घिरट्या घालणं नि कुत्र्याचं माणसासाठीं जीव टाकणं; या सगळ्या गोष्टीं त्यांच्या अवशेष उपजत-बुद्धीमुळेंच त्यांच्या हातून होतात!"

" अस्संऽ??" आश्चर्यानें चेहरा विस्फारित करून दिनू एकदम म्हणाला-

" नि मग गायीच्या नवीन वांसराजवळ गेल्यावर गाय...किंवा कुत्रीच्या पिलांजवळ गेल्यावर कुत्री, आपल्यावर रागानें जणूं डोळे वटारते. कुत्री गुरगुरून दांत दाखवते, आणि गाय शिंगं रोंखून मारायला येते! असं आम्ही लिहिलंय् त्यांत, तें याच कारणामुळें असं तुम्ही म्हणतां, मामा?"

" होऽ होऽ!–शाब्बास!–ते सारं अगदीं याच अवशेष उपजत-बुद्धी-मुळें?" मामा सस्मित म्हणाले–" गोंधळून जाण्याचं कांहीं कारण नाहीं!—कोंबडा सकाळीं ओरडतो; कोंबडी अंडं घातल्यावर ' कॉकॉक् ' असा आवाज करते; संकट आलं तर निराळा दीर्घ आवाज करते, नि पिलांसह पळून जाते. तें सारं या उपजत-बुद्धीमुळेंच. बकरी-मेंढी टेंकाडावरून-कड्यांवरून उड्या मारतांना दिसतात. त्यांना ही उपजत-बुद्धीच तशी प्रेरणा करते. लहान मुलं लपंडाव खेळतात. झाडावर चढायला पाहतात; या गोष्टीं उपजत-बुद्धीचेच खेळ होत. झाडाखालीं रवंथ करीत बसलेला गुरांचा एखादा कळप पहा; तीं साधारणतः वर्तुळाकार नि शेंपट्यांजवळ शेपट्या लावून बसलेलींच आढळतील; त्यांचीं शिंगं त्या वर्तुळाच्या बाहेरच्या बाजूस नि शेपट्या मध्यबिंदूकडे असतील! हें अगदीं सहजगत्याच त्यांच्याकडून होतं; ते सुद्धां या त्यांच्या

" तुम्ही अगदीं मनापासूनच लक्ष देतांहां बरं का!–नि मनाशीं चांगलाच विचार करतां आहां! मी तुम्हाला हें सांगतोंय् याचं अगदीं सार्थक झाल्यासारखंच याक्षणीं वाटतंय् मला!" मामांनीं आनंदून दोघांचं कौतुक केलं.

" पण ही माहितीच मुळीं तशी मोठी गंमतीची आहे, मामाऽ!"-दिनू मूठभर मांस चढल्याप्रमाणें उत्तेजित चेहरा करून म्हणाला.

" अरेऽ नीट लक्ष घालणाऱ्यालाच हें सारं मनोरंजक!" मामा लागलीच म्हणाले—" आळशी मुलं इथं हें ऐकायला असतीं, तर एवढ्यांत जांभया देऊन, तीं पेंगू देखील लागलीं असतीं! क्षणभरानें घोरूंहि लागलीं असतीं!-"

## ३१—अनुभवांतले दाखले.

चार दिवसांपूर्वींच्या आपल्या आठवणींनीं दोघेहि हळूच हसले.

" पण मामाऽ, ही अवशेष उपजत-बुद्धी आपल्या पाळीव प्राण्यांत असते म्हणतां, तर ती आपल्याला दिसत कां नाहीं?" क्षणभरानें दिनूनें विचारलं.

"तुम्हीच पहात नाहीं नीट... म्हणून दिसत नाहीं! दुसरं काय?" मामा पटकन् म्हणाले–" अगदीं मिनिटामिनिटाला दिसेल आपल्याला ती!"

"आम्हाला नाहीं बाऽ अजून दिसली!" रवी अधिकच गोंधळून म्हणाला.

"अस्संऽ? ठीक!– काढ बघूं तुझं मघाचं टिपण?" मामा त्याला आव्हान देत म्हणाले, "तुम्ही पाहून-टिपून जें ठेवलं आहेत,...त्या माहितीतच ही निरनिराळ्या पाळीव प्राण्यांची अवशेष उपजत-बुद्धी सांपडेल! तुम्ही त्या तुमच्याच निरीक्षणाचा तितक्या खोल दृष्टीनें विचार केलेला नाहींत, म्हणूनच वाटतंय् तुम्हाला तसं!"

" खरंऽच!" दिनू व रवी दोघेही मामांजवळ अधिक सरकून बसत म्हणाले. कारण, मामा त्यांचीच मघाची टिपणवही पुन्हां चाळून पहात होते.



## ३२—उपजत-बुद्धीचा प्रताप.

" आतां हें पहा हं! कुत्रा, मांजर, गाय, कोंबडी, एवढ्यांचीच विशेष पहाणी केलेली दिसतेय् तुम्ही!" मामा वहींतून वर डोळे करून दोघांना म्हणाले, " तरीऽ हरकत नाही–हें पहा हं–तुम्हींच लिहिलंय् त्यांतलं हें लक्षांत घ्या–कुत्र्याचं बसतांनाचं गरगर फिरणं, हुंगत हुंगत इकडे तिकडे जाणं, त्याचं रडणं; किंवा मांजरांचं...नखं ओरबडून झाडावर सरळ चढत जाणं, दबकत दबकत भक्ष्यावर झडप घालणं; त्या जनावराचं संथ खाणं नि कुत्र्याचं मात्र बखबखां खाणं; किंवा मांजराचं घराभोंवतीं जीव गुंतवून घिरट्या घालणं नि कुत्र्याचं माणसासाठीं जीव टाकणं; या सगळ्या गोष्टी त्यांच्या अवशेष उपजत-बुद्धीमुळेंच त्यांच्या हातून होतात!"

" अस्संऽ??" आश्चर्यानें चेहरा विस्फारित करून दिनू एकदम म्हणाला-

" नि मग गायीच्या नवीन वांसराजवळ गेल्यावर गाय...किंवा कुत्रीच्या पिलांजवळ गेल्यावर कुत्री, आपल्यावर रागानें जणूं डोळे वटारते. कुत्री गुरगुरून दांत दाखवते, आणि गाय शिंगं रोंखून मारायला येते! असं आम्ही लिहिलंय् त्यांत, तें याच कारणामुळें असं तुम्ही म्हणतां, मामा?"

" होऽ होऽ!–शाब्बास!–ते सारं अगदीं याच अवशेष उपजत-बुद्धी-मुळें!" मामा सस्मित म्हणाले–" गोंधळून जाण्याचं कांहीं कारण नाहीं!—कोंबडा सकाळीं ओरडतो; कोंबडी अंडं घातल्यावर ' कॉकॉक् ' असा आवाज करते; संकट आलं तर निराळा दीर्घ आवाज करते, नि पिलांसह पळून जाते. तें सारं या उपजत-बुद्धीमुळेंच. बकरी-मेंढी टेंकाडावरून-कड्यांवरून उड्या मारतांना दिसतात. त्यांना ही उपजत-बुद्धीच तशी प्रेरणा करते. लहान मुलं लपंडाव खेळतात. झाडावर चढायला पाहतात; या गोष्टी उपजत-बुद्धीचेच खेळ होत. झाडाखालीं रवंथ करीत बसलेला गुरांचा एखादा कळप पहा; तीं साधारणतः वर्तुळाकार नि शेंपट्यांजवळ शेपट्या लावून बसलेलींच आढळतील; त्यांचीं शिंगं त्या वर्तुळाच्या बाहेरच्या बाजूस नि शेपट्या मध्यबिंदूकडे असतील! हें अगदीं सहजगत्याच त्यांच्याकडून होतं; ते सुद्धां या त्यांच्या

मनांतल्या उपजत-बुद्धीच्या अवशेषामुळेंच !...कांहीं पक्षी कळप करून उडत जातात; तेव्हां अशा उलट्या 'व्ही' सारखे जातात. म्होरक्या पुढें असतो; त्यांना इंग्रजी समजतं काय ? छे:!..एक उपजत प्रेरणा तेवढीच कळत असते; म्हणूनच कळपा कळपानें जातात ते ! एका मेंढरानें खड्डयात उडी मारली तर मागचीं शंभरच्या शंभर मेंढरं देखील त्या खेड्यांत विचार न करतां उडी घेतील ! कारण, हा मी म्हणतों तो त्याच्या उपजत-बुद्धीचाच अवशेष ! गांव-डुक्करं पहा-नेहमीं गटारं उपशित फिरतील; सारखी फुरफुर करतील त्यांना चांगलं खायला घातलं तरी तीं तेंच घाणेरडं करतील. कारण, आंतूनच त्यांना तशी प्रेरणा होणार. त्यांचा नाइलाजच असतो त्याबाबत-"

## ३३—मागील इतिहास !

"तुम्ही म्हणतां तसलीं ही भयंकर कोडींच आहेत म्हणायचीं खरीं, मामाऽ! " रवी जरा कुरकुरत म्हणाला, "पण तुमचं स्पष्टीकरण पुरं खरं नाहीं वाटत बुवा मला "

"कांऽबरं ?" मामा आश्चर्यानें म्हणाले- "मी तुम्हाला उदाहरणं दिलीं-त्यांतलीं कांहीं तर तुम्हीच स्वतः पाहिलीं आहेत म्हणतां-त्या मागचा इतिहास तुम्ही लक्षांत घेतलेला नाहीं म्हणून होतोय् तुमचा असा गोंधळ..."

"मागचा इतिहास ?-म्हणजे हो कसा ? " दिनूनें अधीरपणें विचारलं.

"म्हणजे असं पहा!.. आतां सांगितलेल्या सगळ्याच उदाहरणांचा इतिहास सांगून मी उलगडा करीत बसत नाहीं. " मामा पटकन् म्हणाले- "पांच सहा उदाहरणंच घेतों. मग समजेल तुम्हाला ! हे सारे अवशेष उपजत-बुद्धीचेच खेळ आहेत कीं नाहींत ते मग तुम्हीच ठरवा !"

मामा विचार करायला क्षणभर थांबले; तेव्हां रवी-दिनू दोघेही त्यांच्या-कडे सत्सुक मनानें पहात होते.

तेवढ्यांत मामा म्हणाले-" असं पहा-आपला कुत्रा म्हणजे माणसाळ-लेला लांडगाच; तेव्हां, तो नेहमीं भुंकणारा कुत्रा, कधीं हेल काढून रडूं



लागला, तर ती त्यांच्या मनांत दडलेल्या त्यांच्या पूर्वजांची 'जंगलची लल-कारी'च नव्हे कां ? त्यानें खड्डे खणून हडकं लपवून ठेवणं, गादीवर बसतांना सुद्धां गरगर फिरून बसणं, हेही असलेंच जंगली अवशेष, त्यांच्या मनांतले ! मांजरानें नखं ओरबडून झाडावर तुरतुर चढत जाणं, हेंही त्याला नकळतच ! आपल्या पूर्वजांची हजारों वर्षांची हालचाल अजाणतांच त्याला एकदम आठवते, म्हणून तसं होतं. त्यानें दबकत दबकत उदरां-झुरळांवर झडप घालणं, हें त्या पूर्व इतिहासाला व त्यामुळें त्याच्या मनांत दडी मारून बसलेल्या उपजत-बुद्धीच्या अवशेषालाच धरूनच आहे; समजलंऽ? "

## ३४—मागील इतिहास (चालू)

"तें हो कसंऽ ?" रवीनें मध्येंच मामांची गाडी थांबवली.

"अरेऽ, जंगली परिस्थितींत ते पूर्वीं नेहमीं हेंच करीत!" मामा अधिक स्पष्ट करण्यासाठीं सांगूं लागले—"आज ते प्राणी पाळीव झाले. त्यांची परिस्थिती बददलली; तरी हजारों वर्षांचा तो मनावरचा परिणाम, संस्कार, त्यांना नकळतच तें करायला लावतों. मांजरासारखा जंगली अवस्थेतला जन्मजात एकलकोंडा प्राणी, स्वार्थी नि (आपल्या गुहेप्रमाणेंच) फक्त घरावर प्रेम करणारा आढळणार. कुत्र्यासारखा कळप करणाऱ्या लांडग्याचा वंशज (आपल्या सोबत्यांप्रमाणेंच) आपल्या धन्यावर विश्वासानें प्रेम करणार ! त्याच्यासाठीं वेळप्रसंगीं घर सोडून वाटेल तिकडे जायलाहि तयार असणार."

"आणि गायी वगैरे प्राणी, त्यांच्या वासरांपिलांजवळ आपण प्रेमानें गेलं तरी आपल्यावर रागानें पाहून घाबरवतात, तेंऽकां ?" दिनूनें विचारलं.

"तेंही याच कारणासाठीं-" मामा स्पष्टीकरण करूं लागले, "आपल्या दुबळ्या वासरापिलांचं संगोपन मोठ्या धडाडीनें त्यांनीं केलं नसतं, तर तीं इतर हिंस्त्र प्राण्यांच्या भक्ष्यस्थानीं पडलीं असतीं व त्यांच्या जातीचा केव्हांच नायनाट झाला असता. त्या रानटी जंगली संकटमय वातावरणांत त्या दुबळ्या पिलांवर प्रत्येक क्षणाला, इतर मस्त शत्रूंवर शिंगं रोंखून अगर

गुरगुरत, त्यांनीं जागता पहारा केला नसता, तर त्यांना इतर प्राण्यांनीं केव्हांच खाऊन टाकलं असतं. हा हजारों–मी म्हणेन लाखों- वर्षांचा त्यांच्या मनावरील परिणामच !"

रवी–दिनू डोळे विस्फारून ऐकत होते. तेवढ्यांत मामा पुढें म्हणाले– "तोच अजून अवशेष उपजत–बुद्धीच्या रूपानें कायम राहिला आहे. तुम्ही त्यांचीं पिल्लं किंवा वासरं खायला जात नाहीं, हें खरं; पण तरी त्यांचा मात्र त्यावेळीं नाइलाज होऊन असतो. एकदम तयार होणारी उपजतबुद्धीची जोरदार प्रेरणा त्यांना पटकन् सांगते–'संभाळा, बाळांवर हल्ला होईल ! त्यांचं संरक्षण करा !' आणि–मग ती रागानें तुमच्यावर चालून येतात. शिंगं रोखतात; गुरगुरतात !— कोंबडी रानांत होती, तेव्हां अजगर त्यांचीं अंडीं पळवीत. तेव्हां कोंबड्याला जागा करून आपल्या मदतीला बोलवायला नि शत्रूला फसवून अंड्यांपासून दूर न्यायला, त्यांनीं वर्षनुवर्षं हें असंच केलं; आणि म्हणूनच उपजत-बुद्धीनें अजूनही त्या तसंच करतात.–'कॉक् कॉक्'..."

"आणि मामाऽ, गुरांचा कळप बसतो त्याचं तुम्ही मघां काय म्हणालांत ?" रवीनें एकदम आठवून विचारलं.

"होऽ होऽ, तोही ह्या अवशेष उपजत–बुद्धीचाच एक पुरावा आहे!–" मामा स्मरण होऊन म्हणाले, "जंगलांत स्वैर करीत ते कळप बसले, कीं, त्याचवेळीं त्यांच्यावर हिंस्त्र पशूंची एकदम झडप पडे. अशावेळीं सभोंवतीं सारखं लक्ष ठेवण्यासाठीं व वेळ आली तर लागलीच शिंगं रोखून, उभे राहून नि चाल करून जायला, त्यापेक्षां कोठल्या निराळ्या योग्य पद्धतीनें त्यांना बसतां येणार होतं ? शिवाय, मध्यभागीं लहान लहान वासरं घालून त्यांचंही संरक्षण करणं (त्या वर्तुळाकार बसण्यामुळेंच) त्यांना सुलभ होत असे. आतां आजच्या पाळीव स्थितींत तसल्या वर्तुळ बसण्याची जरुरी नाहीं, हें खरं; पण **त्यांच्या मनावर झालेल्या त्या जुन्या इतिहासाच्या परिणामामुळेंच त्यांच्याकडून असल्या गोष्टी अगदीं यंत्रासारख्या घडून येतात.** बकऱ्यामेंढरांचे कळप स्वसंरक्षणासाठीं आपल्या नायका-



मागून धूम पळत सुटत. बचावण्याचा त्यांचा तो एकच एक उपाय असे; त्यावेळीं त्यांनां स्वतंत्र विचार करायला वेळ नसे. या नेहमींच्या पद्धतीच्या संस्काराचा, त्यांच्या मनांतील तो उपजत अवशेष ! तोच आज देखील असा दिसतो आपल्याला ! आणि एकामागून एक कळपांतलीं सारींच मेंढरं बेअक्कलपणें खड्डयांत जाऊन पडतांना आजही आपल्याला दिसतात."

## ३६—अवशेष उपजत–बुद्धीचा नाश.

"हं हं ! यालाच सगळ्याला अवशेष उपजत–बुद्धी म्हणतां होय तुम्ही ? आतां आलं ध्यानांत !" रवी शेवटीं बरंचसं समजल्यामुळें आनंदून मामांना म्हणाला–"पण मामाऽ, तिला 'अवशेष' का म्हणायचं ?"

"कारण, **खरं पहातां, आतां ती जाणीव चालू परिस्थितींत त्यांना पूर्णपणें उपयोगी नसते. नि शिवाय ती दडपली जावी, शक्य तों प्रगट होऊ नये, अशीच सभोंवतीं परिस्थिती असते. यामुळेंच त्या त्या प्रकारची ती जुनाट उपजत–बुद्धी आपल्याला बऱ्याच प्रमाणांत साफ गंजलेली–निरुपयोगी झालेली दिसते. असल्या या नवीन परिस्थितीत त्या परिणामामुळें माणसाचं शेंपूट जसं नाहीसं झालं, तसंच, त्याच्या नि दुसऱ्या प्राण्यांच्याही असल्या उपजत–बुद्धीच्या अवशेषांचाही समूळ नाश होत जाणार आहे ! उलट, चालू नवीन परिस्थितीमुळें, नवीन प्रकारच्या संवयी त्या त्या प्राण्याला जडतील- त्या नवीन संवयींची उपयुक्तता व त्यांचा सारखा परिणाम, यामुळें हजारों वर्षांनीं नवीन नवीन प्रकारची उपजत–बुद्धी तयार होईल. त्यावेळीं ही जुनी उरली सुरली अवशेष उपजत–बुद्धी नाहीशी होईल !"**

"म्हणजे ? हेंऽकसं होईल बुवाऽ ?" दिनूनें आश्चर्यानें म्हटलं." नीट नाहीं बाऽ समजलं मला !"

"कां बरंऽ? सोपंऽआहे !" मामा त्याला समजावीत म्हणाले, "अरेऽ

रानटी माणसांना नेहमीच्या व्यवहारांत उपयोगी होती अशी जी उपजत-बुद्धी –तिचा अवशेष–आपल्यांत अजूनही सांपडतो. या आजच्या पिसाट लढाया म्हणजे तरी काय? हीच ती रानटी स्थितीतली उपजत झुंजार-वृत्ती. पूर्वी प्राण्यांचीं हडकं, काठ्या, अणकुचीदार दगड, लोखंडी हत्यारं, यांच्या सहाय्यानें माणसांची आपआपसांत झुंज चाले. आतां अधिक शहाणा झालेला माणूस विमानं, बॉंब, तोफा, टॉरपेडो, 'V 1', अॅटम बॉम्ब असल्या साधनांनीं, तसलीच रानटी झुंज खेळण्याचा निरुपयोगी गाढवपणा करतो. तो या उपजत-झुंजार-वृत्तीच्या अवशेषामुळेंच–"

"पण या वाईट गोष्टींचा कधीं शेवटच नाहीं होणार कां होऽ मामाऽ!" रवीनें खिन्न स्वरांत मनापासून विचारलं.

"होईल तऽर! अरेऽ, **नवीन परिस्थितीनुरूप नवीन उपजत-बुद्धीही त्याला हळूं हळूं प्राप्त होत चालली आहे!**" मामा पटकन् म्हणाले.

## ३७—नवीन संवयी, नवीन–'बुद्धी'!

"नवीन उपजतबुद्धी?—म्हणजे कशी?" दिनूनें विचारलं.

"**हो! 'माझा देश' म्हणणारा आजचा मनुष्य 'माझं जग' 'माझी माणुसकी' असं म्हणायला हळूहळू हजारों वर्षांनीं शिकेल; नि मग त्याला उपजतच माणुसकीची बुद्धी लाभेल.**"

"कशावरून म्हणतां हें, मामाऽ?" रवीनें प्रश्न टाकला.

"कां बरंऽ? अरेऽ नवीन नवीन संवयीं हजारों वर्षं मनांत रुजल्या, कीं, त्यांतूनच ही जन्मजात उपजत–बुद्धी तयार होते; नाही कां? मग–अशा पुष्कळ नवीन चांगल्या संवयी या सुरवातीच्या एका पशूला–या रानटी माणसाला–आतां हळुहळू लाभत येत आहेत. **माणुसकी, न्यायीपणा, दुसऱ्याबद्दलची सहानुभूती, कृतज्ञता, क्षमशीलता, भूतदया,**



**असल्या अनेक गोष्टींना आपण आज नुसतं 'गुण' असं म्हणतों. नीट विचार केला, तर (माणूस प्राणी या नवीन वातावरणांत, नवीन परिस्थितींत वागत असतांना,) त्याला चांगल्या व अंतीं हितकर ठरणाऱ्या अशा त्याच्या या नवीन संवयीच आहेत. आणि त्यांचा त्याच्या मनावर जेव्हां सारखा सारखा संस्कार होईल, तेव्हां हजारों वर्षांनंतर माणसाला या सर्व गोष्टी उपजतच लाभलेल्या दिसतील**"!

"अरेऽ खरंऽच कीं!" रवी समाधान पावून म्हणाला.

"त्यावेळीं झुंझारपणा, सूडबुद्धि, पिसाट देशभक्ति, स्वार्थीपणा, इत्यादि, **आजच्या माणसांत दिसणाऱ्या, सदोष घातकी उपजत–बुद्धींचे अवशेष, अखेर माणसाच्या शेंपटाप्रमाणेंच साफ नाहींसे झालेले असतील.** आज अजूनही त्याच्या शेंपटीचे सूक्ष्म अवशेष आपल्या-ला त्याच्या पूर्वीच्या पशुत्वाचा पुरावा देतात. तसेच आतां सांगितलेल्या **अनेक पशुतुल्य उपजतबुद्धीचे ढळढळीत अवशेष त्याच्या मनांत अजून रेंगाळत आहेत.** एवढंच!" मामा म्हणाले.

"**म्हणूनच मनुष्य पुष्कळदां पशुसारखा निर्बुद्ध हीन–वृत्तीनें वागतांना आपल्याला अजूनही आढळतो.** असंऽच ना, मामाऽ?" रवीनें मध्येंच विचारलं.

"होऽनाऽ! शेंपटाची जरूर नाहीं म्हणून तें हळुहळू झडत आलं आहे; साफच झडून जाण्याच्या पंथाला लागलं आहे. तसेच, **असले त्याच्या मनांतले अजूनही मधून मधून जोरानें प्रकट होणारे पाशवी स्थितींतल्या उपजत–बुद्धीचे हे अवशेष देखील कालांतरानें साफ झडून जातील!** त्याची उपजतबुद्धीच अगदीं साफ निराळी होईल! माणुस-कीची, प्रेमळपणाची, सहानुभूतीची, सर्व प्राणिमात्रांवर प्रेम करणाऱ्या व सर्व जगच आपलं मोठं कुटुंब म्हणणाऱ्या मनाची, ती नवी जोरदार उपजतबुद्धि माणसाच्या माणुसकीला खरी शोभण्यासारखीच होईल. **हजारों वर्षांच्या**

स्वपराक्रमानें त्यानें जसं आपलं शेंपूट नाहींसं करून, आपण पशूहून निराळे असल्याचं सिद्ध केलं,...तशाच जुन्या पाशवी उपजत-बुद्धीही तो साफ टाकून देईल. आणि आपण साऱ्या पशूंचे व साऱ्या जगाचे खरेखुरे राजे आहों, हे तो प्रत्यक्षपणें दाखवेल !—"

## ३८—भविष्यकाळीं—

" हेंऽच होय, तुम्ही पाहिलेलं माणसाचं शेंपूऽट ?–" दिनू आनंदून म्हणाला. " मग आम्हीही पाहिलं कीं, तें आतां..."

" म्हणजे त्याच्या शरिराची जशी निवडीनुरूप वाढ होत गेली, तशीच त्याच्या मनाचीही पशूहून निराळी अशी उच्च प्रकारची वाढ होत जाईल ! असंऽच ना ?" रवीनेंही उत्सुकतेनें विचारलं.

" हो, असंच म्हणायचं !" मामा म्हणाले, " **हेंऽच बरंऽ माणसाचं शेंपूट !–झडत चाललेलं माणसाचं शेंपूट !"**

" आणि मामा, हीं **माणसाच्या शरिराची नि मनाची निरुप-योगी शेंपटं अशीं अगदीं साफ झडून जातील, तेव्हां तो खरा-खुरा-इतर सर्व प्राण्यांहून निराळाच-प्राणी होईल**; पण मग त्या काळांत इतर प्राण्यांचं हो काय होईल ?–" दिनूनें नवीनच विचार सुचून उत्साहानें विचारलं.

" म्हणजे इतर प्राण्यांच्या शरिरांच्या रानटी अवशेषांचे व त्यांच्या मनांतील रानटी उपजतबुद्धीच्या अवशेषांचे काय होईल,...असंच तुला कोडं पडलं आहे; होऽना दिनू ?" मामा हंसून म्हणाले.

" हो ! म्हणजे त्यांची परिस्थिती बदलेल. तिचा त्यांच्या शरिरावर परिणाम होईल. आणि माणसांच्या संगतीमुळें त्यांच्या मनावरही नाहीं का परिणाम होत जाणार ?" दिनूनें आपली शंका अधिक स्पष्ट करून सांगितली.

" छाऽन ! बरोबर विचार केलास ! " मामा आनंदून क्षणभर विचार



करीत थबकले नि मग म्हणाले, " पण मग माणूस त्यांनाही आपल्याबरोबरच सुधारत नेईल कीं ! काय होईल नक्की सांगतां येत नाहीं, पण वाघ, सिंह वगैरेसारखे हिंस्र रानटी प्राणी साफ नाहीसेहि होतील कदाचित् जगांतून !"

" तें हो कां ?" रवीनें आश्चर्यानें विचारलं.

" अरे, –माणूसच त्यांना ते निरुपयोगी म्हणून– साफ नाहीसे करून टाकील. उपयोगी पाळीव प्राणी आतां आहेत त्याहून साफ बदलतील..मांजरा-सारखे प्राणी कदाचित् निरुपयोगी म्हणून ऱ्हास पावतील. उलट, कुत्र्यांना थोडीशी भाषाही समजूं लागेल; ते अधिक बुद्धीमान होतील. बिनशिंगांच्या व शांत, आज्ञाधारक गायी–म्हशी तयार होतील. वर्षानुवर्षे नुसतं दूध तर दूध (कदाचित फक्त मलाई तर मलईच) देणाऱ्या गायी माणसांच्या गोठ्यांत दिसतील ? " मामा हंसून म्हणाले.

" ते कसं शक्य होईल बुवा ?" दिनूला शंका उत्पन्न झाली.

" अरे, मघां आपण पाहिलेल्या **कृतीम निवडीनें, मनुष्य काय वाटेल ते करून दाखवूं शकेल**. रानटी प्राणी या नांवाची चीज कदाचित् रहाणारच नाहीं जगांत ! जगांतले सारे प्राणी पाळीव-माणसाळलेले, माणसाला उपयोगी असेच होतील; जे निरुपयोगी ठरतील ते याच दृष्टीनें नाहीसे होतील. उपयोगी ठरतील त्यांची उपयुक्तता कृतीम निवडीच्या प्रयोगानें माणूस वाढवेल. वनस्पती तर माणसांना पाहिजे ते देऊं लागतील; पाळीव प्राण्यां-कडूनसुद्धां मनुष्य आपल्याला पाहिजे तें करून घेईल. अशा वेळी रेशमा-सारखी मोठ्या धाग्यांची लोंकर देणाऱ्या मेंढ्या;..फक्त रामफळाएवढीं खायचीं अंडींच देणाऱ्या कोंबड्या; फक्त दूध–लोणी तयार करणाऱ्या गाई–म्हशी; माणसांनी एकदां दिलेले हुकूम पाळणारे व त्यांच्या देखरेखीशिवाय त्यांचं काम करणारे कुत्रे; असले पाळीव प्राण्यांचे चमत्कारच आपल्याला पहायला मिळतील ! पण त्याचा आजच विचार नको आपल्याला—"

## ३९—' म्हणूनच पहायला शिका ! '—

" गंमतच आहे म्हणायची मोठी !–" रवी एकदम आनंदून म्हणाला.

" मामाऽ, पण अजून मला किती तरी प्रश्न विचारायचे आहेत ! " दिनूनें नव्या प्रश्नांच्या फैरीचे सूतोवाच केलं.

" हं..हं...! थांबाऽआतां ! " मामा हंसून म्हणाले–" वाजलेऽकिती ? पाहिलेत कां ?...आतांच साडेबाराचा ठोका पडून गेला; चला, झोपूं या आतां ! सकाळी साडेपांचची मुंबईची गाडी गांठायची आहे मला..."

" पण तुम्ही आतां केव्हां परत येणार आहांत कुणाला ठाऊक !–" रवी मामांबरोबर उठत पण कुरकुर करीत म्हणाला.

" मीही दोन दिवसांनीं जाणार आहे, मामाऽ मुंबईला !—" दिनूही जरा नाराज होऊन म्हणाला—" तुम्ही आज सांगितलं त्यांतलं कांहीं कांहीं मला नीट समजलेलं नाहीं. तें विचारणार होतों मी तुम्हाला पुन्हां !–"

" कांऽ ? लागली कीं नाहीं चटक तुम्हाला ?..." मामा मोठमोठ्यानें हंसून म्हणाले, " चार दिवसांपूर्वी दुपारच्याही पांच पांच तास झोंपा काढणारे तुम्ही दोघे ! आज साडेबारा झाले तरी झोंपायला तयार नाहीं !– **सांगितलेलं मनावर घेतलंत;..आपल्या भोंवतालचं पहायला, त्याचं सूक्ष्म निरीक्षण करायला शिकलांत; म्हणूनच तुम्हाला ही कोडीं पडलीं; तुम्हाला कुतूहल वाटूं लागलं नि मग त्यामुळेंच हे सारे प्रश्नहि पडले.** "

" आणि मामाऽ, आमचे प्रश्न तुम्ही आम्हाला समजतील असे सोडवलेत, समजावून सांगितलेत,...म्हणूनच आम्हाला एवढी माहिती मिळाली." रवी हंसून म्हणाला–" नाही तर आमचं माणसाचं शेंपूट तेवढं वाढत गेलं असतं, या पुढंही—"

" म्हणजेऽ ! आतां अगदीं नाहीसं झाल्यासारखं वाटतंयू कीं काय तुम्हाला ?" मामाही हंसत हंसत बिछान्यावर पडत म्हणाले. " काय रेऽ दिनूऽ ! "



" नाहीं...तुम्ही आमच्या साऱ्या कोड्यांचीं...प्रश्नांचीं उत्तरं आजच दिलीं असतीत अत्तां,...तर वाटलं असतं कदाचित्. " दिनू हंसून म्हणाला.

" वेडा रेऽ वेडा !–**चार दिवसांच्या निरीक्षणामुळें तुम्हाला एवढी माहिती मिळाली. मग सारखं पहातच राहिलांत तर किती नवीन नवीन दिसेल नि किती नवनवीन प्रश्न सुचतील !**" मामा दुसऱ्या कुशीवर होत म्हणाले. " **आळस झाडून निरीक्षण करायला, आपलं कुतूहल वाढवायला शिकलांत आज, हेंच पुष्कळ !**– आतां पुढं प्रश्न-कोडीं पडतील, तीं टिपून ठेवा ! पुढल्या वेळीं मी आणखी सांगेन तुम्हाला. **माणसाचं शेंपूट असं चार दिवसांत नाहीं गळून पडायचं !...त्याला वर्षानुवर्षं प्रयत्न करीत राहिलं पाहिजे !**"

रवी दिनू दोघेही आपापल्या बिछान्यावर पडल्या पडल्या मोठ्यानें हंसले. त्यांनां आणखी बोलतच रहावंसं वाटत होतं; पण त्यांचा नाइलाज होता. मामाच बोलायचे बंद झाले.

किती तरी वेळ, झोंप न आल्यामुळें, दोघेही आपल्या प्रश्नांना अखेर आपणच मनांतल्या मनांत उत्तरं देण्याचा प्रयत्न करीत होते.

त्यांना त्या रात्रीं स्वप्नांत सुद्धां माणसांचं भलं मोठं शेंपूट व मग तें तुटून बाजूला पडलेलं दिसत होतं !...त्या शेंपटाला धरून ते पुढं पुढं जात होते त्यांना वाघ, सिंह, लांडगे चावायला धांवत होते. ते ओरडत रानावनांत कांट्याकुट्यांतून धांवत होते. आणि त्यांच्यामागून माणसाचं शेंपूट धांवत असल्याचा त्यांना भास होत होता !

—ते झोंपेतहि ओरडत होते–" माणसाचं शेंपूट !–माणसाचं शेंपूट !"

—रघुवीर सामंत संपादित—

★

अमर ज्योति
वाङ्मय

★

आपल्या वाढत्या बाळांच्या हातीं द्या !

जुन्या नऊ पुष्पांच्या गटाची दुसरी आवृत्ति तयार होत आहे.

**नव्या पद्धतशीर पुस्तकांचे गट**
**छापून तयार होत आहेत.**
**लौकरच प्रकाशांत येतील.**

**मराठींतील मानसशास्त्रीय दृष्टीनें तयार केलेलें बालवाङ्मय**

—र घु वी र सा मं त सं पा दि त—

★

आपल्या वाढत्या बाळांच्या हातीं द्या!

जुन्या नऊ पुष्पांच्या गटाची दुसरी आवृत्ति तयार होत आहे.

नव्या पद्धतशीर पुस्तकांचे गट
छापून तयार होत आहेत.
लौकरच प्रकाशांत येतील.

मराठींतील मानसशास्त्रीय दृष्टीनें तयार केलेलें बालवाङ्मय